## ठाकरे ब्रँडचा करेक्ट कार्यक्रम



■ **मुंबई :** बेस्टच्या निवडणुकीत उबाठा-मनसेचा पराभव झाला आहे. त्यांनी तो स्वीकारत सुहास सामंत यांचा राजीनामा घ्यावा. सारंग ज्यांनी बेस्ट कामगार पतपेढीमध्ये भ्रष्टाचार केला त्यांना उद्धव ठाकरे शिक्षा देत बेस्ट कामगारांना न्याय देणार का? असा सवाल भाजप आमदार प्रसाद लाड यांनी केला.

आमदार प्रसाद लाड म्हणाले की, बेस्ट निवडणूक ही महायुतीम्हणून लढलो नाही. यामध्ये आम्हाला ७ जागांवर विजय मिळाला असून ४ जागांवर पुन्हा मतमोजणी सुरू आहे. ठाकरे ब्रँड म्हणून निवडणूक लढवणाऱ्यांना एकही जागा मिळाली नाही. त्यांचा करेक्ट कार्यक्रम केला गेला आणि त्यांना एकही जागा मिळाली नाही याचा मला जास्त आनंद आहे.

आमदार प्रसाद लाड म्हणाले की, ठाकरें बंधूंना सहकार कसा चालतो हे माहिती नाही. संस्था ओरबडणाऱ्यांना मराठी माणसाने जागा दाखवली. आता ठाकरे ब्रँडचा बोलबाला बंद होणार का? निवडणूक हरले की ते कारणे देत असतात. त्यांनी कारणे ठरवून घेतले आहे. उबाठाला जनतेने जागा दाखवली आहे. सहकारमध्ये काम करणे खूप अवघड असते, एखादी संस्था चालवणे किती अवघड आहे त्यांना समजणार नाही. संदीप देशपांडे, संजय राऊत यांना आरोप करणे सोपं आहे त्यांनी एखादी संस्था उभी करुण दाखवावी. आदित्य ठाकरेंनी एखादीतरी संस्था सुरू केली आहे का? यांना केवळ आरोप करता येतात बाकी काही जमत नाही. दीड वर्षांमध्ये आमच्या ७ जागा येऊ शकतात तर ५ वर्षांमध्ये सत्ता आमच्याकडे येऊ शकते असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## केवळ स्वतःच्या फायद्यासाठी ठाकरेंकडून बेस्टचे नुकसान



■ **मुंबई :** शिवसेना ठाकरे गटाने बेस्टमध्ये चालवलेल्या कामगार विरोधी आणि खासगीकरणाच्या धोरणामुळे कामगारांनी त्यांच्या पाठ फिरवली. आज बीएसटीच्ण झालेल्या दशेला पूर्णतः शिवसेना आणि त्यांची बेस्ट कामगार सेना ही युनियन जबाबदार आहेत, अशी टीका बेस्ट वर्कर्स युनियनचे शशांक राव यांनी केली.

बेस्ट एम्प्लॉइज को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या निवडणुकीत शशांक राव यांच्या बेस्ट वर्कर्स युनियन पुरस्कृत पॅनलने १४ जागा जिंकत एकहाती यश संपादन केले. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या उत्कर्ष पॅनलला २१ पैकी एकही जागा मिळवता आली नाही. तर महायुतीच्या पॅनलला ७ जागांवर समाधान मानावे लागले. शशांक राव म्हणाले, शिवसेना युबीटी यांनी बीएसटीमध्ये कामगार विरोधी आणि खासगीकरणाचे धोरण चालवलेले आहे. त्या धोरणाविरोधात कामगारांनी नोंदवलेले हा विजय आहे. हा लढाच त्याचा होता. आज बीएसटीची जी दशा झाली, त्यासाठी पूर्णतः शिवसेना आणि त्यांची बेस्ट कामगार सेना ही युनियन जबाबदार आहेत, अनेक वर्ष त्यांनी फक्त स्वतःच्या फायद्यासाठी या बीएसटीचे नुकसान केलेले आहे. ९ वर्षांमध्ये जो काही भ्रष्टाचार झालेला आहे, त्याची चौकशी करणार हे आमच्या वचननाम्यात आहे. हा सर्व पैसा कामगारांचा आहे. कामगारांचा पैसा स्वतःच्या मौजमस्तीसाठी उधळणार असाल, तर त्याची फक्त चौकश करणार नाही, तर त्यात काही आढळले तर वसुली देखील केली जाईल, असेही राव यांनी सांगितले. दोन भाऊ एकत्र आले की नाही, हा प्रश्न नाही. मुळात तुम्ही कामगारांसाठी काम करत असाल, तर तुम्ही एकटे असले, तरी निवडणूक दिले जातात, हे आज कामगारांनी दाखवून दिलेले आहे. असे म्हणत शशांक राव यांनी ठाकरे बंधुंच्या एकत्र येण्यावरही भाष्य केले.

## मुंबईतील रुग्णालयातून फरार गर्भवती बांग्लादेशी महिला अटक

■ **मुंबई :** मुंबईतील जेजे रुग्णालयातून पळून गेलेल्या २१ वर्षीय गर्भवती बांगलादेशी महिलेला पोलिसांनी अटक केली आहे. नवी मुंबई पोलिसांनी या महिन्याच्या सुरुवातीला रुबिना इर्शाद शेख नावाच्या महिलेला भारतात बेकायदेशीर वास्तव्याच्या आरोपाखाली अटक केली होती, त्यानंतर तिला भायखळा महिला तुरुंगात ठेवण्यात आले होते.

पोलिसांनी सांगितले की, १५ ऑगस्ट रोजी या महिलेला उपचारासाठी जेजे रुग्णालयात आणण्यात आले होते. तिथे तिने तिच्यासोबत असलेल्या एका महिला कॉन्स्टेबलला धक्का दिला आणि गदीर्चा फायदा घेत पळून गेली. सीसीटीव्ही फुटेज तपासल्यानंतर तिला नवी मुंबईतील घणसोली येथून अटक करण्यात आली आहे.

पोलिसांनी सांगितले की, या महिलेवर आधीच पासपोर्ट कायदा आणि परदेशी नागरिक कायद्याअंतर्गत आरोप आहेत. आता तिच्याविरुद्ध कोठडीतून पळून गेल्याबद्दल भारतीय न्याय संहितेच्या कलम २६२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# कोसळधारचा कहर सुरूच!

## मुसळधार पावसाने कल्याण, वसई, विरार ठप्प ■ अडीच लाख ग्राहक अंधारात





■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २०:**
सलग चौथ्या दिवशी कोसळणा?या मुसळधार पावसाने मुंबईसह उपनगरांचा अक्षरशः कहर केला आहे. रस्त्यांवर पाणी साचून वाहतूक ठप्प झाली, रेल्वे रुळ पाण्याखाली गेल्याने लोकल आठ तास अडखळली आणि आता वीजपुरवठ्यानेही हात टेकला! कल्याण, वसई व विरार परिसरात तब्बल अडीच लाख वीज ग्राहक अंधारात ढकलले गेले आहेत.

महावितरणकडून दिलेल्या माहितीनुसार, कल्याण बोर्ड कार्यालय-१ अंतर्गत नांदिवली, आडिवली, टिटवाळा आणि बदलापूर भागात वीज खंडित झाली आहे. पण सर्वाधिक फटका बसला तो वसईझविरार भागाला. इथं पुराच्या पाण्याने तब्बल १३०० रोहित्र बंद पाडले, परिणामी दोन लाखांहून अधिक ग्राहकांचा पुरवठा थांबवावा लागला. बदलापूर परिसरालाही पाणीपुरवठा करणाऱ्या भिनार पाडा वीज यंत्रणेत पाणी शिरल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत.

दरम्यान, महावितरणने हा निर्णय खबरदारीचा उपाय म्हणून घेतल्याचे स्पष्ट केले आहे. मात्र, अचानक आलेल्या या संकटामुळे सामान्य नागरिकांची प्रचंड गैरसोय झाली असून, युद्धपातळीवर वीजपुरवठा पूर्ववत करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे सांगण्यात आले आहे. पावसाचा जोर कमी होतो का आणि नागरिकांना पुन्हा प्रकाशाचा श्वास घेता येतो का? याकडे सर्वांचे डोळे लागले आहेत.

दरम्यान, इगतपुरी भागातही पावसाचा धुमाकूळ सुरू आहे. मुसळधार पावसामुळे इगतपुरी नगरपरिषद क्षेत्रातील वाघाचा झाप, मेंगल झाप आणि काटोरे वस्ती या आदिवासी वाड्यांचा शहराशी संपर्क पूर्णपणे तुटला आहे. रस्त्यांवर पाणी आणि चिखल साचल्याने ग्रामस्थांना त्रास सहन करावा लागत आहेत.

### उल्हास नदीचा कहर... जांभूळपाडा, बदलापूर धोक्यात

ठाणे जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे उल्हास नदी धोक्याची पातळी ओलांडून तांडव मांडू लागली आहे. जांभूळपाडा आणि बदलापूर परिसरात पाणी सतत वाढत असून नदीने आपला रौद्ररूप दाखवायला सुरुवात केली आहे. या भीषण परिस्थितीमुळे प्रशासनाने नागरिकांना तातडीचा इशारा देत सज्ज राहण्याचे आदेश दिले आहेत.

रात्रीपासून सुरू असलेल्या पावसामुळे नदीच्या पाण्यात सतत वाढ होत आहे. आधीच बदलापूर आणि जांभूळपाडा परिसरात घरांच्या आवारात पाणी शिरले असून नागरिकांची चांगलीच धावपळ सुरू झाली आहे. विशेष म्हणजे, स्थानिक प्रशासन व आपत्ती व्यवस्थापन पथकांनी सतर्कतेचा इशारा दिल्यानंतरही काही ठिकाणी लोक अजूनही घर सोडायला तयार नाहीत. त्यामुळे धोका अधिकच वाढला आहे.

उल्हास नदीच्या पुरामुळे बदलापूर रेल्वे स्थानक परिसरासह अनेक गावे पाण्याखाली जाण्याची भीती व्यक्त होत आहे. प्रशासनाने नागरिकांना अनावश्यक घराबाहेर न पडण्याचा, सुरक्षित स्थळी हलण्याचा आणि अफवांवर विश्वास न ठेवण्याचा सल्ला दिला आहे. एनडीआरएफ व स्थानिक बचाव पथके सज्ज असून, कुठलीही आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी तयारीत आहेत.

सध्या नागरिकांचे डोळे पावसाच्या पुढील घडामोडींवर खिळले आहेत. उल्हास नदीचा वेग थांबतो का की आणखी भीषण रूप धारण करतो, हे पाहणे निर्णायक ठरणार आहे!

### नाशिक जिल्ह्यात मुसळधार

जिल्ह्यातील धरणांच्या पाणलोट क्षेत्रात पावसाचा जोर कायम असून नाशिकमध्ये मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. यामुळे धरणांमधून पाण्याचा विसर्ग टप्प्याटप्प्याने वाढवला जाण्याची शक्यता आहे.

### उल्हास नदीवरील पूल पाण्याखाली

गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे उल्हास नदीला पूर आला असून, कल्याण-अहमदनगर (अहिल्यानगर) महामार्गावरील पूल पाण्याखाली गेला आहे. त्यामुळे हा महामार्ग वाहतुकीसाठी तात्काळ बंद केला आहे.

# बेस्ट निवडणुकीत ठाकरे बंधूंना भोपळा

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २०:**
मुंबईच्या बेस्ट कामगार पतपेढी निवडणुकीत ठाकरेंचा भोपळा फुटला आहे. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांची इतिहास घडवणारी पहिलीच युती ह्यउत्कर्ष पॅनल म्हणून मैदानात उतरली. प्रचारादरम्यान चर्चा, गाजावाजा आणि चमत्कार घडणार अशा घोषणांनंतरही निकालात शून्य जागांवर समाधान मानावे लागले.

उद्धव-राज ठाकरेंच्या उत्कर्ष पॅनलला २१ पैकी एकाही जागेवर विजय मिळवता आला नाही. हा पराभव दारुणच नाही तर राजकीय भविष्यासाठी धोक्याची घंटा मानला जातो. दरम्यान, सर्वाधिक जागा जिंकत शशांक राव पॅनलने तब्बल १२ जागांवर विजय मिळवला आणि थेट सत्ता काबीज केली. त्याचवेळी, आमदार प्रसाद लाड यांच्या नेतृत्वाखालील महायुती प्रणित समृद्धी पॅनलला अवघ्या ९ जागा मिळाल्या.

या निवडणुकीत तब्बल ८३ टक्के मतदान झाले होते. ठाकरे बंधुंची पहिलीच जुगलबंदी पाहण्यासाठी उत्सुकता शिगेला पोहोचली होती. नऊ वर्षे बेस्ट पतपेढीवर वर्चस्व राखलेल्या उद्धव ठाकरेंच्या कामगार सेनेने मनसेसोबत हातमिळवणी केल्याने या वेळी ठाकरेंचाच डंका वाजणार असे बोलले जात होते. पण निकालाने सगळी समीकरणेच उलथवली.

सोमवारी मतदान झाल्यानंतर मंगळवारी सकाळी मतमोजणी व्हायची होती. पण पावसामुळे अधिकारी दुपारपर्यंतच आले. मतमोजणी रात्रभर सुरू राहिली आणि अखेर बुधवारी पहाटे निकाल जाहीर झाला.

मागील ९ वर्षे बेस्ट पतपेढीवर कामगार सेनेची सत्ता होती. यंदा मनसेसोबतची युती करून ठाकरे बंधु मोठी एन्ट्री घेतील असा अंदाज होता. पण त्यांचे सर्व स्वप्न भोपळा ठरले. महायुतीचे प्रसाद लाड, नितेश राणे, प्रवीण दरेकर यांनी शशांक राव यांच्यासोबत जोरदार रणशिंग फुंकले आणि अखेर ठाकरेंच्या पॅनलला धूळ चारली.

मुंबई महापालिकेसाठी उद्धव-राज युती होणार की नाही, यावर सगळ्यांचे लक्ष लागलेले असतानाच या निवडणुकीतील शून्य निकालाने ठाकरेंच्या गोटाला जबरदस्त हादरा दिला आहे. बेस्ट पतपेढीतील पराभवाने त्यांच्या राजकीय ताकदीवर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे.

## हेडफोन कानात आणि मृत्यू दारात

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २०:**
भांडूपमधील पावसाच्या पाण्यातून आज एक हृदयद्रावक घटना समोर आली आहे. साचलेल्या पाण्यात विजेचा करंट उतरलेला असून, लोक सतत आरडाओरड करून नागरिकांना सावध करत होते. पण कानात हेडफोन घालून चालणाऱ्या १७ वर्षीय तरुणाला हा इशारा ऐकूच गेला नाही... आणि क्षणातच त्याचे आयुष्य संपले.

**पाण्यातील करंटने तरुणाचा मृत्यू**

मृत तरुणाचे नाव दीपक पिल्ले असे असून, तो परिसरातील रहिवासी होता. पाण्याचा प्रवाह आणि लोकांच्या इशाऱ्याकडे दुर्लक्ष करून तो पुढे गेला आणि काही क्षणातच जोरदार विजेच्या धक्क्याने कोसळला. पाहता पाहता परिसरात खळबळ उडाली. नागरिक धावत सुटले, पण तोपर्यंत खूप उशीर झाला होता.

स्थानिकांच्या मते, तरुणाने हेडफोनमुळे बाहेरील आवाज ऐकू न आल्याने हा अपघात घडला. जर हेडफोन कानात नसते तर कदाचित त्याचे प्राण वाचले असते, अशी खंत व्यक्त होत आहे.

दरम्यान, या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पावसाळ्यात साचलेल्या पाण्यातून चालताना विशेष खबरदारी घेण्याचे आणि कानाल हेडफोन लावणे टाळण्याचे आवाहन प्रशासनाने नागरिकांना केले आहे.

## मुंबई-नाशिक महामार्ग ठप्प!

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २०:**
मुंबई-नाशिक महामार्गावर आज सकाळी भीषण अडथळा निर्माण झाला आहे. जुन्या कसारा घाटातील जव्हार फाट्याजवळ प्रचंड दरड कोसळल्याने वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली. घाटातील डोंगराळ भागात सलग पावसामुळे जमिनीचे मोठे तुकडे घसरून थेट रस्त्यावर आले.

या अपघातानंतर महामार्गावर शेकडो वाहने अडकली असून प्रवाशांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. पोलिस आणि महामार्ग प्राधिकरणाची पथके तातडीने घटनास्थळी दाखल झाली आहेत. दरड हटवण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू झाले असले तरी रस्ता मोकळा करण्यासाठी काही तास लागू शकतात, असे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

दरडीच्या आवाजाने परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते. सुदैवाने मोठी जीवितहानी झाल्याची माहिती समोर आलेली नाही. मात्र अजूनही डोंगरकड्यावरील माती सैल झाल्याने आणखी दरडी कोसळण्याची शक्यता नाकारता येत नाही. मुंबई-नाशिक महामार्ग हा राज्याच्या उत्तर-दक्षिण वाहतुकीसाठी जीवनवाहिनी मानला जातो. अशा वेळी या दरडीमुळे झालेली वाहतूक कोंडी हजारो प्रवाशांना मोठा अडथळा ठरणार आहे.

# अर्धेअधिक पुणे पाण्याखाली



■ **विशेष प्रतिनिधी महासागर, पुणे, दि. २०:**
गेल्या दोन दिवसांच्या मुसळधार पावसाने पुणे शहराला अक्षरशः वेढलं आहे. घाटमाथ्यावर संततधार सुरू असून पुण्याला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांमध्ये पाणीसाठा झपाट्याने वाढला आहे. खबरदारीचा उपाय म्हणून प्रशासनाने खडकवासला धरणातून मुठा नदीत तब्बल ३५ हजार क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू केला. पण एवढ्यावरच थांबले नाही झ्र सकाळी ९ वाजता हा विसर्ग वाढवून ३९ हजार क्युसेक करण्यात आला.

या प्रचंड पाण्याच्या विसगार्मुळे पुण्यातील अनेक सोसायट्या जलमग्न झाल्या आहेत. एकता नगर परिसरात पाणी घरात शिरलं असून नागरिकांची धांदल उडाली आहे. काही ठिकाणी कंबरेपर्यंत पाणी साचल्याने रहिवासी घराबाहेर पडायलाही घाबरत आहेत. प्रशासनाला तातडीने रेस्क्यू ऑपरेशन सुरू करावं लागलं.

अग्निशमन दल, पोलीस, आपत्ती व्यवस्थापन आणि ठउऋ च्या पथकांनी युद्धपातळीवर मोर्चा उघडला आहे. नागरिकांना बोट, ट्यूबच्या सहाय्याने बाहेर काढलं जात आहे. रात्रीपासून सुरू असलेली ही धावपळ अजूनही सुरूच आहे.

मुठा नदी खवळली, पाणी सोसायट्यांत घुसलं, रेस्क्यू युद्धपातळीवर सुरू आहे. पुणेकरांच्या मनात आता भीतीचं सावट पसरलं असून, पुढच्या काही तासांत पावसाचा जोर कायम राहिल्यास परिस्थिती किती भयानक वळण घेईल, याचीच भीती नागरिकांना सतावत आहे.

मुंबई, ठाणे, पालघरनंतर आता पुण्यावर पावसाने कहर सुरू केला आहे. रात्रीपासून सुरू झालेल्या मुसळधार पावसाने पुण्यातील एकता नगर परिसर जलमय झाला असून नागरिक अक्षरशः घराबाहेर पडण्यास मजबूर झाले. घरात पाणी शिरताच लोकांनी हाताला लागेल ते सामान उचललं आणि सुरक्षित स्थळी धाव घेतली.

महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी नुकतीच या भागाची पाहणी करून नागरिकांना आश्वस्त केले होते. पण पावसाचा जोर इतका वाढला की, एकतानगरमधील सोसायट्यांमध्ये पाणी घुसल्याने परिस्थिती हाताबाहेर गेली. नागरिकांची चांगलीच धांदल उडाली आणि प्रशासनाला तातडीने रेस्क्यू ऑपरेशन सुरू करावं लागलं.

दरम्यान, खडकवासला धरणातून तब्बल ३५ हजार ५०० क्यूसेक विसर्ग सुरू आहे. यामुळे मुठा नदीला पूर आल्यानं एकतानगर परिसर जलमग्न झाला. अग्निशमन दल आणि आपत्ती व्यवस्थापनाच्या पथकांनी रात्री उशिरापर्यंत शेकडो नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवलं.

स्थानिकांमध्ये भीतीचं वातावरण असून आणखी पाऊस वाढल्यास परिस्थिती बिकट होऊ शकते, अशी चर्चा सुरू आहे. प्रशासनाकडून मात्र सर्व यंत्रणा सज्ज आहेत, नागरिकांनी घाबरू नये असा दिलासा दिला जात आहे.

पुण्याला मुसळधार पावसाने पुन्हा एकदा पाण्यातलं शहर बनवलं आहे, तर एकतानगरचं रेस्क्यू ऑपरेशन हा येणाऱ्या आणखी मोठ्या संकटाचा इशारा असल्याचं मानलं जातं.

### मुळशीमध्ये रेकॉर्ड ब्रेक पाऊस

मुळशी धरण परिसरात पावसाने अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. मुळशी धरण परिसरात दावडी ४२८ मिलिमीटर शिरगाव ४३० मिलिमीटर आणि आंबवणे ३३८ मिलिमीटर पाऊस पडला आहे. काही घरांमध्ये घरात पाणी शिरले असून सूचना देऊन नागरिकांना घराबाहेर काढण्यात आले

पिंपरी चिंचवड शहरात पावसाचा जोर थोडा ओसरला असला तरी. पवना आणि मुळा नदी पात्रातील पाणीपातळी मोठी वाढ होणार, अशी माहिती पिंपरी चिंचवड महापालिका आपत्ती व्यवस्थापन विभाग प्रमुख ओमप्रकाश बहिवाल यांनी दिली आहे.

### प्रसिद्ध ओंकारेश्वर मंदिर पाण्याखाली

मुठा नदीला आलेल्या या पुरामुळे नदीकाठच्या वस्त्या आणि गावांना प्रशासनाने सतर्कतेचा इशारा दिला आहे. पुण्यातील प्रसिद्ध ओंकारेश्वर मंदिर पूर्णपणे पाण्याखाली गेले असून, ते दर्शनासाठी बंद ठेवण्यात आले आहे. पुणे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनीही पूर परिस्थितीचा आढावा घेतला असून, नागरिकांना सुरक्षित राहण्याचे आवाहन केले आहे.

माऊलींच्या आळंदीतील इंद्रायणी नदीला देखील पूर आला आहे. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या मंदिर परिसरात पाण्याची पातळी झपाट्याने वाढत असून, भक्ती-सोपान पूल तसेच दर्शन बारीचा पूल पूर्णपणे पाण्याखाली गेले आहेत. नदीने पात्र सोडून घाटावर पाणी शिरले असून, ती दुथडी भरून वाहत आहे.

पुरस्थिती अधिक गंभीर होण्याचा धोका लक्षात घेऊन प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून जुन्या पुलावर आणि इंद्रायणी घाटावर नागरिक व भाविकांची प्रवेशबंदी केली आहे. मंदिर परिसरात पाणी शिरल्याने भाविकांसाठी तीर्थक्षेत्रात जाणे सध्या धोकादायक ठरू शकते, अशी सूचना प्रशासनाने दिली आहे. सलग पडणाऱ्या पावसामुळे इंद्रायणी नदीची पातळी धोक्याच्या वर गेली आहे.

# राज्यातील गणेश भक्तांसाठी आनंदाची वार्ता

## भारतीय रेल्वेचे यंदा ३६७ जादा फेऱ्यांसाठी रेल्वेगाड्या सोडण्याचे नियोजन

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २०:**
राज्यातील गणेश भक्तांसाठी आनंदाची बातमी समोर आली आहे. भारतीय रेल्वेने दरवर्षीपेक्षा यंदा ३६७ जादा फेऱ्यांसाठी रेल्वे गाड्या सोडण्याचे नियोजन केले आहे. यामुळे राज्यातील गणेश भक्तांना इतर ठिकाणी जाण्यात मदत होणार आहे. यावर्षी राज्य सरकारच्या वतीने गणेशोत्सव हा राज्योत्सव म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी घेतलेल्या या निर्णयामुळे चाकरमान्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

गणेशोत्सव हा महाराष्ट्राचा मानबिंदू असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. या उत्सवासाठी कोकणात तसेच राज्यभरात इतरत्र जाण्यासाठी गणेशभक्तांना प्रवास करावा लागतो. या प्रवासासाठी रेल्वेचा आधार महत्वाचा ठरतो. यासाठी यंदा भारतीय रेल्वेने दरवर्षी पेक्षा यंदा ३६७ जादा फेऱ्यांसाठी रेल्वेगाड्या सोडण्याची नियोजन केल्याची माहिती रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही माहिती देतानाच, राज्यातील तमाम गणेशभक्तांच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी, रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांचे आभार मानले आहे.





आगामी गणेशोत्सवाच्या नियोजनाच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने रेल्वे मंत्री आणि भारतीय रेल्वेला गणेशभक्तांच्या सुविधेसाठी जादा गाड्या सोडण्याची मागणी केली होती.

मुंबईत राहणारे कोकणवासी गणेशभक्त गणेशोत्सवासाठी मोठ्या संख्येने मूळगावी कोकणात जातात. तसेच राज्याच्या अन्य भागातील नागरिक देखील या सणासाठी प्रवास करतात. या सगळ्यांची या जादाच्या फेऱ्यांमुळे सोय होणार आहे. राज्यातील गणेश भक्तांसाठी हा मोठा दिलासा आहे. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांचे आभार मानत असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी माध्यमांशी संवाद साधताना सांगितले.

यापूर्वी, महाराष्ट्र सरकारने जुलैच्या सुरुवातीला सार्वजनिक गणेशोत्सवाला महाराष्ट्र राज्य महोत्सव म्हणून अधिकृतपणे घोषित केली आहे. सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी विधानसभेत या निर्णयाची घोषणा केली होती.

# नूतन जिल्हाधिकारी म्हणून वर्षा मीना यांनी स्वीकारला पदभार

अकोला : अकोला जिल्ह्याच्या नव्या जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी बुधवारी दुपारी जिल्हाधिकारी पदाची सुत्रे स्वीकारली. श्रीमती मीना यांनी जिल्हाधिकारी म्हणून पदभार स्वीकारताच विविध विभागप्रमुखांची ओळख करुन घेतली. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील विविध विभागांची पाहणी केली. जिल्हाधिकारी यांनी कार्यालयाची नवीन इमारत, जिल्हा नियोजनभवन, उपाहारगृह, अभिलेखागार व विविध कार्यालयाची पाहणी केलीयावेळी अपर जिल्हाधिकारी महेश परंडेकर, निवासी उपजिल्हाधिकारी विजय पाटील, उपजिल्हाधिकारी निखिल खेमनार, जोगेंद्र कट्यारे उपविभागीय अधिकारी डॉ शरद जावळे, जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी अनिल चिंचोले, तहसीलदार सुरेश कव्हळे आदी उपस्थित होते.



# अरे देवा, दिवाळीतील रेल्वे आरक्षण ६० दिवस आधीच झाले फुल्ल!

■अकोला,दि २० (प्रतिनिधी) :

नोकरी, व्यवसाय किंवा शिक्षणाकरिता मुंबई आणि पुणे यांसारख्या महानगरांमध्ये वास्तव्यास असणारे अकोलेकर दिवाळीच्या सणासाठी आपल्या गावी येण्यास आतुर असतात. सणासुदीच्या दिवसांमध्ये गावी परत येण्यासाठी रेल्वे हा सर्वांत स्वस्त आणि सोयीचा पर्याय असल्यामुळे ६० दिवस आधीच मुंबई, पुणे येथून दिवाळीच्या आधीचा दिवस अर्थात १७ ते १९ ऑक्टोबरचे आरक्षण पूर्णपणे फुल्ल झाले आहे.

**'कन्फर्म'ची आशा, पण 'रिग्रेट'ची निराशा!**

यंदा धनत्रयोदशी १८ ऑक्टोबर रोजी तर लक्ष्मीपूजन २१ ऑक्टोबर रोजी असल्याने बरेच प्रवासी शुक्रवार १७ ऑक्टोबर रोजी मुंबई आणि पुणे येथून निघतील. रेल्वेच्या नियमांनुसार, १७ ते १९ ऑक्टोबर २०२५ या दिवसांसाठीचे दिवाळीचे आरक्षण ६० दिवस आधी सुरू झाले आणि अवघ्या काही मिनिटांतच ते फुल्लही झाले. १७ ते १९ ऑक्टोबर या काळात मुंबई/पुणे-अकोला स्लीपर क्लासचे आरक्षण करताना 'रिग्रेट' (ठशसीशीं) असा मेसेज साईटवर झळकत आहे. आपल्या हक्काच्या रेल्वेत कन्फर्म तिकीट मिळवण्यासाठी झगडावे लागत आहे, अशी तीव्र भावना प्रवाशांमधून व्यक्त होत आहे.



**अतिरिक्त रेल्वे गाड्या सोडा!**

**दरवर्षी दिवाळीत अवघ्या काही मिनिटांत आरक्षण फुल्ल होते. त्यामुळे अनेक प्रवाशांना गावी जाताना अडचणींचा सामना करावा लागतो. दलालांवर नियंत्रण ठेवावे. तसेच, विदर्भातील प्रवाशांच्या सोयीसाठी दिवाळीत अतिरिक्त रेल्वे गाड्या सोडण्याबाबत आम्ही मध्य रेल्वेकडे मागणी करणार आहोत.**

**-ॲड. अमोल इंगळे, रेल्वे प्रवासी संघटना**

**खरोखरच फुल्ल की आणखी काही?**

मुंबई-नागपूर, पुणे-नागपूर मार्गावर इतक्या गाड्या धावत असताना, काही मिनिटांतच गाड्या फुल्ल होऊन 'वेटिंग' आणि नंतर 'रिग्रेट' मेसेज कसा काय झळकू शकतो? यात नक्कीच काहीतरी गडबड आहे? रेल्वे अधिकारी-कर्मचारी आणि एजंट यांच्या संगनमताने हा प्रकार घडत आहे का, याची चौकशी व्हायला हवी.

**१७ ऑक्टोबर २०२५ स्लीपर कोच आरक्षण स्थिती**
**मुंबई ते अकोला**
ज्ञानेश्वरी एक्सप्रेस – REGRET
गीतांजली एक्स्प्रेस REGRET
मुंबई – हावडा मेल – REGRET
विदर्भएक्स्प्रेस–REGRET
अमरावती एक्स्प्रेस – REGRET
सेवाग्राम एक्सप्रेस – REGRET
शालिमार एक्स्प्रेस – REGRET
मुंबई – गया – REGRET
मडगाव – नागपूर एक्सप्रेस – WL १२५

**पुणे ते अकोला**
वंदे भारत एक्सप्रेस – REGRET
पुणे-अजनी AC एक्सप्रेस – REGRET
पुणे – काझीपेठ – REGRET
आझाद हिंद एक्स्प्रेस – REGRET
पुणे – बिलासपूर एक्सप्रेस – REGRET
महाराष्ट्र एक्स्प्रेस – REGRET
पुणे – अमरावती द्विसाप्ताहिक (लातूर मार्ग) – REGRET
पुणे – अमरावती एक्सप्रेस (मनमाड मार्ग)– REGRET

# पालकमंत्र्यांच्या हस्ते दिव्यांगांना 'जयपूर फूट' वितरण

■अकोला,दि २० (प्रतिनिधी) :लोकनेते स्व. भाऊसाहेब फुंडकर यांच्या जयंतीनिमित्त इंडियन रेडक्रॉस सोसायटीतर्फे राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांच्या हस्ते दिव्यांग बांधवांना विनामूल्य कृत्रिम अवयव (जयपूर फूट) वितरण शिबिर उद्या, दि. २१ ऑगस्ट रोजी दु. ४ वा. जि. प. कर्मचारीभवन येथे होणार आहे.

पालकमंत्री ॲड. फुंडकर यांचा दौरा पुढीलप्रमाणे : दु. ४ वा. अकोला येथे आगमन व इंडियन रेडक्रॉस सोसायटीच्या विनामूल्य कृत्रिम अवयव वाटप शिबिराला उपस्थिती, त्यानंतर अकोला येथून खामगावकडे प्रयाण. सायंकाळी ७ वा. खामगाव येथे आगमन व लोकनेते स्व. भाऊसाहेब फुंडकर यांच्या जयंतीनिमित्त विविध लोकार्पण कार्यक्रमास उपस्थिती.

# कृषी विद्यापीठात स्थापनेसाठी बलिदान देणाऱ्या शहिदांना श्रद्धांजली



■अकोला,दि २० (प्रतिनिधी) :

शेतकऱ्यांचे मार्गदर्शक असलेल्या डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाची स्थापना विदर्भातच व्हावी याकरिता प्रचंड मोठे आंदोलन १९६८ साली उभारण्यात आले होते आणि या आंदोलनातील सहभागी आंदोलकांनी २० ऑगस्ट रोजी अमरावती येथे उग्र निदर्शने केली होती. विद्यापीठ आंदोलकांना रोखण्यासाठी झालेल्या गोळीबारात नरेंद्र देशमुख, सुरेश भडके, भिरुमल रिझुमल, सुरेश कुऱ्हे, प्रफुल्लचंद्र कोठारी, गजानन देवघरे, नेमीचंद गोपाल, सुरेश वानखडे, शेख रफिक शहीद झाले तर असंख्य विदर्भवीर जखमी झाले. या शहिदांचे बलिदान मात्र व्यर्थ गेले नाही कारण विदर्भाच्या शेती क्षेत्राला नवी दिशा देण्यासाठी डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाची स्थापना अकोला येथे २० ऑक्टोबर १९६९ रोजी झाली.विद्यापीठ स्थापनेसाठी बलिदान देणाऱ्या शहिदांना आदरांजली वाहण्यासाठी दरवर्षी विद्यापीठ मुख्यालयी शहीद स्मारक येथे विशेष सभेचे आयोजन २० ऑगस्ट रोजी करण्यात येते. आज संपन्न झालेल्या या श्रद्धांजली सभेसाठी विद्यापीठ विद्यार्थी कल्याण अधिकारी कार्यालयाचे वतीने जय्यत तयारी करण्यात आली होती.

# दिव्यांगांना आत्मनिर्भर करण्यासाठी 'जयपूर फूट' उपयुक्त : जिल्हा पोलीस अधिक्षक



■अकोला,दि २० (प्रतिनिधी) :

दिव्यांग बांधवांना आत्मनिर्भर करण्यासाठी जयपूर फूट उपयुक्त असून, त्याचे गरजूंना विनामूल्य वितरण हे मोठे सेवाकार्य असल्याचे प्रतिपादन जिल्हा पोलीस अधिक्षक अर्चित चांडक यांनी आज येथे केले.

इंडियन रेडक्रॉस सोसायटी व लॉयन्स क्लब ऑफ पुणे सुप्रिम यांच्या संयुक्त विद्यमाने लोकनेते स्व. भाऊसाहेब फुंडकर यांच्या जयंतीनिमित्त जयपूर फूट विनामूल्य वितरण महाशिबिर आयोजित करण्यात आले, त्यावेळी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. रामेश्वर मणियार, रजनी अंबादे, नितीन धोत्रे, संस्थेचे चेअरमन डॉ. किशोर मालोकार, प्रकाश गवळी, अविनाश बेलोकार, प्रभजितसिंह बछेर आदी उपस्थित होते.

ज्येष्ठ पत्रकार प्रकाश पोहरे यांनीही शिबिराला भेट देऊन शुभेच्छा दिल्या.

समाजहितासाठी सेवेची प्रक्रिया सातत्यपूर्ण असणे गरजेचे असते. त्यामुळे सर्वांनी सेवाकार्यात सहभागी व्हावे, असे आवाहन श्री. चांडक यांनी यावेळी केले. मनोज चांडक यांनी सूत्रसंचालन केले. ॲड. सुभाषसिंह ठाकूर यांनी आभार मानले. संदीप पुंडकर, ॲड. सुभाष मुंगी, ॲड. महेंद्र साहू, प्रशांत राठी, संदेश चांडक, कपिल रावदेव, राजू बुडुकले, राममहरी डांगे, अमर गौड, डॉ. गजानन वाघोडे, पंकज राठी आदी उपस्थित होते.

# समाजसेवेला प्रेरणेचे अधिष्ठाण पाहिजे : डॉ.संतोषकुमार कोरपे

- **डॉ.संतोषकुमार कोरपे जीवन गौरव पुरस्कारा बाबत सत्कार**



■अकोला,दि २० (प्रतिनिधी) :

प्रेरणा असल्याशिवाय समाजसेवेची उर्मीच येत नाही. त्याशिवाय मनाची तयारीच होऊ शकत नाही. कुठल्याही कामात स्वत:ला झोकुन दिल्याशिवाय समाज उत्थानाचा धागा मिळत नाही. क्षेत्र कुठलेही असो त्यात तन-मनाने रमले तरच लोक कार्याची पावती फाडतात, असे प्रतिपादन अकोला-वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष डॉ. संतोषकुमार कोरपे यांनी केले.

त्यांना सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी व योगदानाबाबत महाराष्ट्र स्टेट को. ऑप. बँक असोसिएशन,मुंबई यांचे कडुन जीवन गौरव पुरस्काराने गौरविण्यात आल्यानंतर त्यांचा दि. १५ ऑगस्ट २०२५ रोजी आदर्श कॉलनी, संभाजी नगरातील नागरीकांनी केलेल्या हृद्य नागरी सत्काराला उत्तर देतांना ते बोलत होते. या वेळी विचार मंचावर सौ. डॉ. पद्मावतीताई कोरपे, बँकेचे माजी अध्यक्ष डॉ.सुभाषचंद्र कोरपे, यांची उपस्थिती होती. मधुकरराव गावंडे हे कार्यक्रमाचे अध्यक्ष होते.डॉ. कोरपे पुढे बोलतांना म्हणाले, सन्मान, गौरव मिळण्यासाठी मोठ्या खस्ता खाव्या लागतात, खस्ता खाणाऱ्यालाच सामाजीक कार्याचा किंबहुना सामाजीक उत्थानाचा टप्पा गाठता येतो. जीवनात बदल होत असले तरी त्या बदलात स्वत:ला समरस व्हावे लागते. मी पेशाने डॉक्टर होतो परंतु वडील कै. डॉ. अण्णासाहेब कोरपे यांच्या नंतर मला बँकेकडे वळावे लागले. पेशा वेगळा आणि स्थित्यंतर वेगळ्याच ठिकाणी परंतु येथे स्वत:ला झोकुन देत कार्य केले. बँकेच्या कामकाजाने शेतकरी, शेतमजुरासह, सामान्य नागरीकांच्या व्यथा समजल्या, यातुनच सामाजीक दायीत्वाचे मनात बिज रोवले गेले. सहकाराच्या माध्यमातून समाजात विशेषत: शेतकरी समाजाच्या उत्थानाच्या दिशेने कार्य करीत राहिलो. यामध्ये चढ-उतार आले असतील, परंतु खडतड वाट तुडवित जीवन गौरव या पुरस्कारापर्यंत पोहचलो असे ते म्हणाले. दरम्यान आदर्श कॉलनी, संभाजी नगरातील युवकांना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी आपलाही हातभार लागला पाहिजे असे आवाहन ही त्यांनी यावेळी केले. कार्यक्रमाची सुरवात दिप प्रज्वलन व छत्रपती श्री. शिवाजी महाराज व सहकार महर्षी डॉ.अण्णासाहेब कोरपे यांचे प्रतिमा पुजनाने झाली.

# राष्ट्रीय सद्भावना दिवस निमित्त मनपा अधिकारी कर्मचाऱ्यांदारे घेण्यात आली शपथ



**अकोला :** २० ऑगस्ट २०२५ रोजी राष्ट्रीय सद्भावना दिवस निमित्त अकोला महानगरपालिकेच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर मुख्य सभागृह येथे आयोजित कार्यक्रमामध्ये मनपा अधिकारी कर्मचा-यांव्दारे शपथ घेण्यात आली. यावेळी मनपा सहा.आयुक्त राजेश सरप, मंगेश जाधव, गणेश गावंडे, महेश राऊत, राहूल राऊत, दिपक शिरसाट, कृष्णा वाकोडे, आर.एन.शिरसाट, विनोद गोहर, विश्वनाथ सुतवणे, मुकेश झांझोटे, आतिश उंटवाल, आकाश चावरे यांचेसह ईतर कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

# तेल्हारा शहरातील डिजेचा आवाजाने नागरिक झाले हैराण

- **पोलीसाच्या डोळ्यासमोरील प्रकार**
- **तरीही पोलीस कार्यवाही नाही**
- **डिजे बंदीचा तेल्हारा शहरात उडाला फज्जा डीजेच्या अती आवाजाने नागरिकाची उडाली तारांबळ**

■तेल्हारा,दि २० (प्रतिनिधी) :

तेल्हारा शहरातील १८ आगस्ट रोजी तेल्हारा शहरातुन निघालेल्या विविध कावड मिरवणुकीतील डिजे च्या आवाजाने नागरीकांना हैराण करुन सोडले विशेष म्हणजे पोलीस प्रशासनासमोर हा वाढता आवाज असतानाही पोलीस प्रशासन मात्र काहीच करायला तयार नसल्याने पोलीसाची चुप्पी मात्र कशासाठी असा प्रश्न शहरवासीयांना पडला एकीकडे डिजे वाजविण्यास बंदी असतानाही तेल्हारा शहरात विविध मिरवणुकीत उत्सव समारंभात डिजे वापर पोलीसाच्या नाकावर टिच्चून करण्यात येत असल्याचे दिसून येत आहे एवढी आवाजाची गती पाहता पोलीसानी डिजे वाल्याना सर्व राण मोकळे करुन दिले काय असे आजच्या आवाजाने दिसून येत आहे हृदयरोगाचे तेल्हारा शहरात मोठ्या प्रमाणावर रुग्ण आहेत त्या रूग्णाची काय अवस्था होत असेल हे त्यानाच माहिती बंदीचा प्रभाव फक्त कागदोपत्री असल्याचे आज दिसुन आले पोलिसांच्या डोळ्यासमोर वाढलेला डिजेचा आवाज पाहता पोलीस आवाजावरती काहीच कारवाई करायला तयार नसल्याने तेल्हारा शहरातील पोलीसाच्या एकरीत कारभाराबाबत नागरीकांनी नाराजी व्यक्त केली आहे डिजेच्या भयानक आवाजाने नागरिक हैराण झाले आहेत. रुग्णालये, शाळा, आणि वृद्ध मंडळी यांना या ध्वनीप्रदूषणाचा त्रास सहन करावा आज तर शहरातील डिजे वाल्यानी डिजेच्या आवाजाची मर्यादाच ओलांडली होती याचा मोठा त्रास नागरीकाना सहन करावा लागला त्यामुळे नागरीक संताप व्यक्त करीत आहे बंदीचे आदेश दिल्यानंतरही ठिकठिकाणी डीजेचे संच उभे राहतात. जनतेला एवढा जर त्रास होत असेल तर पोलीसानी कारवाई करावी अशी आशा जनतेला पोलीसाकडुन असते पण पोलीस काहीच कारवाई करीत नसल्याने जनतेने न्याय मागायचा तरी कुणाकडे असा प्रश्न ही या निमित्ताने उपस्थित करण्यात येत आहे 'सामान्य नागरिकांनी नियम पाळायचे आणि प्रभावशाली लोकांनी डीजे सुरू ठेवायचे, हे अन्यायकारक आहे' अशी भावना व्यक्त केली जात आहेएकूणच, कागदावर बंदी आणि प्रत्यक्षात जल्लोष अशी स्थिती निर्माण झाली आहे. यावर ठोस आणि कडक कारवाई केली नाही, तर ही डीजे संस्कृती बंदीला झुगारून अधिक बळकट होईल, अशी भीती व्यक्त होत आहे.

**कु. रश्मी मुरलीधर इंगळे हिची केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या ( UPSC ) मार्फत**

# आयुष वैद्यकीय अधिकारी वर्ग-१, दिल्ली येथे निवड



■अकोला,दि २० (प्रतिनिधी): लहान उमरी येथील प्रगतशील शेतकरी मुरलीधर विठ्ठल इंगळे यांची कन्या डॉ. रश्मी मुरलीधर इंगळे हिने सर्वात कठिण परिक्षा म्हणजे केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) ह्या परिक्षेत अथक परिश्रम घेवून उत्तीर्ण झाली. तिची नेमणूक आयुष वैद्यकीय अधिकारी वर्ग-१ म्हणून महानगर पालिका दिल्ली येथे झाली आहे. एका शेतकऱ्यांची कन्या एवढ्या मोठ्या पदावर गेली तीचे कौतुक होत आहे. ती आपल्या यशाचे श्रेय गुरुवर्य सह मुरलीधर विठ्ठल इंगळे वडील, आई सौ. पुष्पा मुरलीधर विठ्ठल इंगळे, भाऊ प्रसाद मुरलीधर इंगळे, योगेश लक्ष्मण इंगळे, जयंत इंगळे सह मित्र परिवारास देते.

# गोरक्षण रोडच्या राजाचे सर्वात प्रथम थाटात आगमन



■अकोला,दि २० (प्रतिनिधी) :

गणेशोत्सवाच्या आगमनाने अकोला शहर गणेशमय झाले असून गोरक्षण रोडवरील विघ्नहर्ता गणेशोत्सव मंडळाने यंदा शहरातील सर्वात मोठ्या मूर्तीची प्रतिष्ठापना केली आहे. मुंबई येथील प्रसिद्ध मूर्तिकार प्रथमेश गाडगे यांच्या कुशल हस्तकौशल्यातून साकारलेली तब्बल ३१ फूट उंचीची भव्य व आकर्षक गणेशमूर्ती शुक्रवारी मोठ्या थाटामाटात मंडपात दाखल झाली.यावेळी फटाक्यांची आतषबाजी, अमरावती येथील शिव साम्राज्य ढोल पथकाचा नाद, बाहुबली हनुमानाची उपस्थिती यामुळे आगमन सोहळा अविस्मरणीय ठरला. शहरातील नेहरू पार्क चौकातून भव्य मिरवणुकीला प्रारंभ झाला. भक्तांचा उत्साह, ङ्गगणपती बाप्पा मोरयाङ्कच्या जयघोषात संपूर्ण परिसर दुमदुमला. गोरक्षण रोडचा राजाङ्क आता मंडपात विराजमान झाला असून गणेशोत्सवापासून आगामी अकरा दिवस शहरवासीयांसाठी भक्ती, उत्साह आणि ऐक्याचा सोहळा अनुभवण्याचे केंद्रस्थान ठरणार आहे.गोरक्षण रोडवरून निघालेल्या या शोभायात्रेत शेकडो नागरिक सहभागी झाले होते. मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, स्थानिक नागरिक तसेच महिला व बालकांनीही मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. ठिकठिकाणी मंडळाकडून फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. रस्त्याच्या दुतर्फा उभारलेल्या तोरणबंदांनी, सजावटीच्या रोषणाईने आणि ढोल-ताशांच्या तालावर झालेल्या नृत्यामुळे वातावरण अधिकच उत्साही झाले. विघ्नहर्ता गणेशोत्सव मंडळ दरवर्षी भव्यतेसह सामाजिक भान जपत गणेशोत्सव साजरा करते. समाजहिताचे अनेक उपक्रम राबविणाऱ्या या मंडळाने यावर्षी अकोल्यातील सर्वात उंच गणेशमूर्तीङ्क उभारून शहरवासीयांसाठी एक आगळावेगळा अनुभव निर्माण केला आहे. मूर्तीची भव्यता, तिच्या कलाकुसरीचे आकर्षण आणि दिव्य स्वरूपाने उपस्थितांना भारावून टाकले.फक्त भव्य सजावट व मूर्तीपुरतेच मर्यादित न राहता मंडळ विविध समाजोपयोगी उपक्रम देखील राबवते. रक्तदान शिबिरे, पर्यावरण संवर्धन मोहिमा, तसेच शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांची परंपरा मंडळाने जपली आहे. यावर्षीदेखील गणेशोत्सव काळात विविध सेवा कार्ये राबविण्याची योजना आहे.आगमन प्रसंगी गोरक्षण रोड परिसरात हजारोंच्या संख्येने भक्तांनी गर्दी केली होती. ढोल-ताशांचा निनाद, फुलांच्या उधळणीसह भक्तांच्या उत्साही जयघोषामुळे परिसर गणेशमय झाला. मूर्ती मंडपात पोहोचताच विधिविधानपूर्वक प्रतिष्ठापना करण्यात आली.

**३१ फूट उंचीची भव्य गणेशमूर्ती**

# शहरात छायाचित्रकारांची कॅमेरा दिंडी

अकोला : अकोला बुलढाणा जिल्हा फोटोग्राफर्स असोसिएशन च्या वतीने जागतिक छायाचित्र दिनानिमित्त १९ ऑगस्ट रोजी शहरातून कॅमेरा दिंडी काढण्यात आली. विशेष म्हणजे अकोला जिल्ह्यातच हा उपक्रम अकोला-बुलढाणा छायाचित्रकार संघटनेद्वारे राबविला जातो. मंगळवारी सकाळी राजेश्वर मंदिरापासून निघालेल्या कॅमेरा दिंडीच्या आरंभी राजेश्वराचे पूजन व कॅमेराला सजवून ज्येष्ठ छायाचित्रकार बाजीराव वझे यांच्या हस्ते पूजा करण्यात आली. असोसिएशनचे अध्यक्ष नरेंद्र नायसे, उपाध्यक्ष नीरज भांगे, दिग्विजय देशमुख, सचिव नितीन देशमुख, सहसचिव उमेश चाळसे, योगेश उन्होने, महेश इंगळे, हर्षल गढेकर, राहुल ताडे, विशाल खंडारे, अजय जागीरदार, सारंग वझे, राम शर्मा, संदीप शाहू, पंकज पराते, राज पिम्पले, गणेश खेते, संजय सरकटे, अवि तायडे, प्रवीण अम्बिलकर, अता कुरेशी, विक्की कलमकार, अनिरुद्ध तराले, दिनेश पिल्ले संजय आगाशे, अरविंद इंगळे, विशाल मानतकर तसेच महिला फोटोग्राफर रेवती भांगे, श्वेता पिम्पले, स्वाती इंगळे उपस्थित होते. दिंडी जयहिंद चौक, मोठा पूल, शहर कोतवाली, गांधी रोड, मनपा चौक मार्गे स्वराज्य भवन परिसरात दिंडीचा समारोप झाला.

# सततच्या पावसामुळे भिंत कोसळली



■पातुर,दि २० (प्रतिनिधी) :

गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या सतत धार पावसामुळे पातुर तालुक्यातील अनेक गावांमध्ये जनजीवन विस्कळीत झाले आहे. खामखेड येथे देखील मुसळधार पावसाचा फटका बसला असून गावातील गणेश मोतीराम बिलेवार यांच्या घराची भिंत अचानक कोसळली.सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र भिंत कोसळल्यामुळे घरातील साहित्याचे मोठे नुकसान झाले आहे. मुसळधार पावसामुळे माती सैल झाल्याने ही दुर्घटना घडली असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.ग्रामपंचायत सदस्य आणि स्थानिक नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन नुकसानग्रस्त कुटुंबाला मदत केली.

सततच्या पावसामुळे गावातील इतर घरांनाही धोका निर्माण झाला असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. प्रशासनाने तातडीने पंचनामा करून नुकसानग्रस्त कुटुंबाला शासकीय मदत मिळावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# राधाकृष्णन विरूद्ध सुदर्शन

उपाध्यक्षपदासाठी इंडिया आघाडीने बी सुदर्शन रेड्डी यांना एनडीएचे उमेदवार सीपी राधाकृष्णन यांच्या विरोधात उभे केले आहे. दोन्ही उमेदवार दक्षिण भारतातून आहेत. रेड्डी हे सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश होते, तर राधाकृष्णन हे महाराष्ट्राचे राज्यपाल आहेत. दोन्ही उमेदवार २१ सप्टेंबरपर्यंत अर्ज दाखल करतील आणि ९ सप्टेंबर रोजी मतदान होणार आहे. दोन्ही पक्षांनी दक्षिण भारतातून उमेदवार का निवडले? इंडिया आघाडी सत्ताधारी एनडीएला पराभूत करू शकेल का? आणि उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुका कशा होतील? देशभरात याची उत्सुकता लागून राहिली आहे.

------------

१७ ऑगस्ट रोजी भाजप संसदीय मंडळाच्या बैठकीत, एनडीएने सीपी राधाकृष्णन यांचे नाव जाहीर केले, जे सध्या महाराष्ट्राचे राज्यपाल आहेत. सीपी राधाकृष्णन यांनी १९७४ मध्ये वयाच्या १७ व्या वर्षी आरएसएसमधून आपल्या राजकीय कारकिर्दीला सुरुवात केली. त्यानंतर ते भारतीय जनसंघ आणि भाजपमध्ये सामील झाले. राधाकृष्णन हे तमिळनाडू भाजपचे प्रदेशाध्यक्ष, खासदार आणि कॉयर बोर्ड ऑफ इंडियाचे अध्यक्षही राहिले आहेत.

दुसरीकडे, १९ ऑगस्ट रोजी इंडिया कोलिशनने याविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. सेवानिवृत्तन्यायमूर्ती बी सुदर्शन रेड्डी यांची उपराष्ट्रपती पदासाठी निवड करण्यात आली आहे. ७९ वर्षीय रेड्डी हे गुवाहाटी उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आणि गोव्याचे पहिले लोकायुक्त राहिले आहेत.


२००७ मध्ये रेड्डी यांची सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नियुक्ती करण्यात आली. रेड्डी यांनी २०१० मध्ये 'लेव्ही विरुद्ध कर्नाटक सरकार' खटल्यात हा निकाल दिला होता, ज्यामध्ये नार्को चाचणी आणि ब्रेन मॅपिंगचा कायदेशीर कक्षेत समावेश करण्यात आला होता. रेड्डी हे सध्या हैदराबादच्या आंतरराष्ट्रीय लवाद आणि न्यायाधिकरणाचे न्यायाधीश आहेत.

भारतात राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपती पदासाठी एक परंपरा आहे. याचा अर्थ असा की एक व्यक्ती उत्तर भारतातील असेल आणि दुसरी दक्षिण भारतातील असेल. गेल्या अनेक वर्षांपासून, राजकीय पक्ष आणि युती प्रादेशिक प्रतिनिधित्वासाठी त्यांचे उमेदवार निवडत आहेत. उत्तरेकडून दक्षिणेकडे पक्षाचे वर्चस्व राखण्यासाठी ही एक अनौपचारिक रणनीती आहे. या कारणास्तव, एनडीए आणि इंडिया अलायन्सने दक्षिण भारतातून उपराष्ट्रपती पदासाठी उमेदवार उभे केले आहेत.

राजकीय तज्ज्ञ रशीद किडवाई म्हणतात, 'एनडीए, विशेषतः भाजप दक्षिण भारतात आपली पकड मजबूत करण्याचा प्रयत्न करत आहे, जिथे त्यांचे वर्चस्व कमी आहे. तामिळनाडूसारख्या राज्यात भाजपच्या मतांची टक्केवारी वाढली आहे, परंतु जागांमध्ये हा बदल पूर्णपणे प्रस्थापित झालेला नाही.

सीपी राधाकृष्णन हे तामिळनाडूतील भाजपचे एक मजबूत नेते आहेत, ज्यांच्याद्वारे भाजपला दक्षिण भारतात आपली पोहोच मजबूत करायची आहे. यामुळे जनतेला संदेश जाईल की भाजप राष्ट्रीय स्तरावर दक्षिणेतील नेत्यांना महत्त्व देते.

हिलाल अहमद यांच्या मते भाजप ११ वर्षांपासून केंद्रात सत्तेत आहे, तरीही दक्षिण भारतात ते फारसे काही करू शकलेले नाही. पंतप्रधान मोदी दक्षिणेच्या राजकारणावर वर्चस्व गाजवण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळेच त्यांनी तामिळनाडूतील एका नेत्याला उपराष्ट्रपतीपदाचे दावेदार बनवले आहे. याशिवाय २०२४ मध्ये तामिळनाडू विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत.

राधाकृष्णन यांच्या माध्यमातून भाजपला तामिळनाडूचे राजकारण उजळवायचे आहे.'

किदवई म्हणतात, 'एनडीएपेक्षा इंडिया आघाडीचे दक्षिण भारतात जास्त वर्चस्व आहे. राहुल गांधींच्या भारत जोडो यात्रेने काँग्रेसला दक्षिणेत मजबूत पक्ष बनवला आणि राहुल गांधी स्वतः केरळचे खासदार आहेत. भाजपचे प्रयत्न हाणून पाडण्यासाठी अखिल भारतीय आघाडीने दक्षिणेतून उमेदवार उभा केला.

हिलाल अहमद म्हणतात, 'डीएमके आणि टीएमसी सारख्या पक्षांना, जे अखिल भारतीय आघाडीचा भाग आहेत, त्यांना दक्षिणेतून मजबूत उमेदवार हवा होता. तेलंगणा मूळचे सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती बी. सुदर्शन रेड्डी हे या पदासाठी प्रबळ दावेदार आहेत.'

भारतीय संविधानाच्या कलम ६६ आणि उपराष्ट्रपती निवडणूक नियम, १९७४ अंतर्गत, उपराष्ट्रपतींची निवड लोकसभा आणि राज्यसभेच्या खासदारांनी एकत्रितपणे केली जाते, ज्याला 'इलेक्टोरल कॉलेज' म्हणतात. असे म्हटले जाते. निवडून आलेले खासदार आणि नामनिर्देशित खासदार त्यात मतदान करू शकतात.

उमेदवार हा भारताचा नागरिक असावा. त्याचे वय किमान ३५ वर्षे असावे. तो लोकसभा किंवा राज्यसभेचा सदस्य होण्यास पात्र असावा. त्याने केंद्र किंवा राज्य सरकारच्या अंतर्गत कोणतेही फायदेशीर पद धारण करू नये.

उमेदवारांना त्यांचे नामांकन पत्र दाखल करावे लागेल ज्याला किमान २० खासदारांचे समर्थन असले पाहिजे. आणि २० खासदारांना प्रस्तावक म्हणून स्वाक्षरी करावी लागेल. उमेदवारी अर्ज रिटर्निंग ऑफिसर म्हणजेच राज्यसभेच्या सरचिटणीसांकडे सादर केले जातात.

उमेदवाराला १५,००० रुपये सुरक्षा रक्कम जमा करावी लागेल, जी हरल्यास परत मिळणार नाही. यानंतर नामनिर्देशन पत्रांची छाननी केली जाते. जर काही चूक आढळली तर उमेदवारी रद्द केली जाते. निवडणूक आयोग मतदानाची तारीख ठरवतो, जी संसद भवनातील एका विशेष ठिकाणी होते. मतदान गुप्त मतदानाने केले जाते आणि प्रत्येक खासदाराच्या मताला समान महत्त्व असते. खासदार त्यांच्या आवडत्या उमेदवाराच्या नावापुढे एक खूण करतात. जर दोनपेक्षा जास्त उमेदवार असतील तर प्राधान्य मतदान वापरले जाते. म्हणजेच, खासदार त्यांच्या पहिल्या पसंतीचा, दुसऱ्या पसंतीचा किंवा तिसऱ्या पसंतीचा क्रमांक लावतात. जसे की १, २, ३...

लोकसभा आणि राज्यसभेचे सर्व खासदार म्हणजेच निवडून आलेले आणि नामनिर्देशित खासदार मतदान करू शकतात. यावेळी एकूण ७८२ खासदार निवडणुकीत मतदान करण्यास पात्र आहेत. मतदानानंतर, त्याच दिवशी निवडणूक अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली मतमोजणी केली जाते. बहुमत मिळवणारा उमेदवार जिंकतो.

जर कोणालाही बहुमत मिळाले नाही, तर सर्वात कमी मते मिळवणारा उमेदवार बाहेर पडतो. काढून टाकलेल्या उमेदवाराला मिळालेली मते त्याच्या मतदारांच्या दुसऱ्या पसंतीच्या उमेदवाराकडे हस्तांतरित केली जातात. ही प्रक्रिया अंतिम निकाल येईपर्यंत सुरू राहते.

**उपराष्ट्रपतीच्या निवडणुकीत व्हीप लागू नाही**

व्हीप हा राजकीय पक्षाचा त्यांच्या खासदारांना किंवा आमदारांना एखाद्या विशिष्ट विधेयकावर मार्गदर्शन करणारा असतो किंवा निवडणुकीत मतदान कसे करावे हे सांगतो. जर एखाद्या खासदाराने व्हीपविरुद्ध मतदान केले तर त्याला पक्षातून काढून टाकले जाऊ शकते किंवा त्याचे सदस्यत्व रद्द केले जाऊ शकते. पक्ष त्यांच्या खासदारांना विधेयके मंजूर करण्यासाठी, अविश्वास प्रस्ताव आणण्यासाठी किंवा संसदेत इतर हेतूंसाठी व्हिप जारी करू शकतात.

उपराष्ट्रपतीची निवडणूक गुप्त मतदान पद्धतीने होते, ज्यामुळे कोणालाही कळत नाही की खासदाराने कोणत्या उमेदवाराला मतदान केले आहे? या प्रक्रियेमुळे खासदारांना मुक्तपणे मतदान करण्याचे स्वातंत्र्य मिळते.

उपराष्ट्रपतींची भूमिका संसदेशी जोडलेली आहे, म्हणजेच ते राज्यसभेचे अध्यक्ष आहेत. या कारणास्तव, फक्त खासदारांनाच मतदानाचा अधिकार देण्यात आला आहे. प्रत्येक खासदाराच्या मताला समान महत्त्व आहे. म्हणजेच लोकसभा खासदार आणि राज्यसभेतील खासदाराचे मत समान आहे. यामध्ये वेटेज व्यवस्था नाही.

एनडीएला दोन्ही सभागृहात ४२२ सदस्यांचा पाठिंबा आहे, तर बहुमतासाठी दोन्ही सभागृहात ३९१ खासदारांची आवश्यकता आहे. पाठिंबा आवश्यक आहे. त्याच वेळी, इंडिया आघाडीचे लोकसभेत २३४ खासदार आणि राज्यसभेत ७७ खासदार आहेत. म्हणजेच, भारतीय आघाडीला दोन्ही सभागृहात ३१२ सदस्यांचा पाठिंबा आहे. अशा स्थितीत बहुमत नसतानाही इंडिया अलायन्सने उमेदवार का उभा केला? हा प्रश्न कायम राहतो. इंडिया आघाडीला हे दाखवायचे होते की ते प्रबळ विरोधी पक्ष आहेत आणि एनडीएविरोधात आवाज उठवतील. जरी विजय शक्यता संख्या कमी आहे, पण उमेदवार उभे करून त्यांनी प्रत्येक लढतीत सहभागी होऊन हार मानणार नाही, असा संदेश दिला आहे. बी. सुदर्शन रेड्डी यांना निवडून देऊन, भारत आघाडीने दाखवून दिले आहे की ते संविधानाचे रक्षण करण्यात आणि सामाजिक न्याय सुनिश्चित करण्यात मागे राहणार नाहीत.

आज उमेदवारी अर्ज भरण्याचा अखेरचा दिवस असून, पुढील महिन्यात निवडणूक आहे. एनडीए आघाडीचा विजय जवळपास सुनिश्चित मानला जात आहे.

■ ■ ■

(कालच्या अंकावरून पुढे)

# भविष्यातील विश्वगुरू भारतासाठी शिक्षणाचा मंत्र

भाग २

-----------

एकंदरित शिक्षकांची भूमिका फक्त माहिती देणाऱ्याची न राहता, facilitator आणि mentor ची झाली पाहिजे. शेवटी, शिक्षणाची खरी उद्दिष्टे म्हणजे आकलन, अंमलबजावणी, आणि आत्मविकास. जेव्हा शिक्षण concept-centered, skill-oriented And experience-integrated असेल, तेव्हाच ते खऱ्या अर्थाने अर्थपूर्ण ठरेल.

विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेचं मोजमाप त्यांच्या गुणपत्रिकेवर नाही, तर त्यांच्या विचारसरणी, अंमलबजावणीत आणि स्व-निर्णय क्षमतेत दिसायला हवं. म्हणून, शिक्षणपद्धतीत केवळ अभ्यासक्रमाचे अद्यतन नाही, तर शिकवण्याच्या पद्धतीमध्येही क्रांतिकारक बदल होण्याची हीच योग्य वेळ आहे. कारण आज शिकवलेली प्रत्येक गोष्ट उद्याचं भारत घडवत आहे आणि ते भारत केवळ ज्ञानी नसावं, तर सक्षम, सर्जनशील आणि आत्मनिर्भर असावं, हीच खरी अपेक्षा आहे.

विद्यार्थी जीवनाची सुरुवात जिथून होते, त्या शाळेपासूनच आपल्याला केवळ पुस्तकातील ज्ञान देण्यापेक्षा जीवनकौशल्य, समाजात राहण्याची शिस्त, दुसऱ्यांशी संवाद साधण्याची पद्धत, परस्पर सन्मान, स्वच्छता, सार्वजनिक मालमत्तेची काळजी, विविधतेचा स्वीकार आणि नागरिक म्हणून जबाबदाऱ्या या सर्व बाबी शिकवल्या गेल्या पाहिजेत. म्हणजेच योग्य civic sense ही शाळेपासूनच रुजवली पाहिजे.

याचबरोबर विद्यार्थ्यांमध्ये पाठांतरावर आधारित शिक्षण न देता समजून घेण्यावर आधारित conceptual learning दिली गेली पाहिजे. सध्याची परीक्षा पद्धत केवळ लिहिलेल्या उत्तरावर आधारित गुण देते, परंतु एखादी गोष्ट विद्यार्थ्याला प्रत्यक्षात कितपत समजली आणि त्याने ती कुठे आणि कशी वापरली, हे महत्वाचं असायला हवं. त्यामुळे गुण हे केवळ लिखित परीक्षेवर आधारित न ठेवता, विद्यार्थ्याच्या समज, कौशल्ये, communication, reasoning आणि problem solving यावर आधारित मूल्यांकन पद्धती विकसित होणं गरजेचं आहे.

भारतासारख्या देशात शिक्षण व्यवस्थेत असमानता ही फार मोठी समस्या आहे. CBSE आणि सरकारच्या शाळांमधील दर्जामध्ये खूप मोठं अंतर आहे. CBSE शाळांमध्ये चांगले infrastructure, updated syllabus, trained faculty असते, तर अनेक सरकारी शाळांमध्ये अजूनही प्रयोगशाळा केवळ एक शोकेस बनून राहिल्या आहेत. जुनाट projector, वापरण्यायोग्य नसलेली chemicals, रिकाम्या beakers आणि जुनी उपकरणं यावर science शिकवली जाते, हे दुर्दैव आहे. NEP (National Education Policy) २०२० नुसार, या दरीला कमी करण्याचा प्रयत्न केला जातो आहे, परंतु प्रत्यक्षात २०२५ मध्येही अनेक राज्यांतील सरकारी शाळांमध्ये अजूनही basic facilities चा अभाव आहे.

भारताला विविधतेत एकता असं म्हटलं जातं, पण दुर्दैवाने अनेक ठिकाणी जाती, धर्म, भाषा यावर आधारित भेदभाव आणि खुलं वंशद्वेष आजही अस्तित्वात आहे. शिक्षणपद्धतीतूनच सर्व धर्म, जाती, पंथ यांचा आदर, सहिष्णुता आणि सर्वसमावेशकतेचे मूल्य रुजवले गेले पाहिजे. विद्यार्थ्यांना एकमेकांचा सन्मान करायला शिकवलं गेलं पाहिजे. कारण देश चालवणारे पुढचे नागरिक हेच विद्यार्थी असणार आहेत.

थोडक्यात सांगायचं झालं, तर शिक्षण हे गुणांवरून कौशल्याकडे, पुस्तकांपासून प्रत्यक्ष आयुष्याकडे, आणि दडपणातून ध्येयाकडे वळलं पाहिजे. अभ्यास म्हणजे फक्त परीक्षेपुरता मर्यादित न राहता, तो विद्यार्थ्याच्या व्यक्तिमत्त्व विकासाला पूरक ठरायला हवा. शिक्षण म्हणजे केवळ माहितीचा भरणा नव्हे, तर समज, अनुभव आणि जीवन जगण्याची कला शिकवणं हेच खरं शिक्षण होय.

आज जर भारताच्या प्रगतीचा वेग काही प्रमाणात मंदावलेला वाटत असेल, तर त्यामागे तांत्रिक किंवा आर्थिक अडचणींच्याइतकंच, एक अत्यंत गंभीर कारण म्हणजे नागरिकांची मानसिकता.

लोकांच्या मनामध्ये अजूनही देशाने आपल्यासाठी काय केलं? हा प्रश्न असतो, पण आपण देशासाठी काय करू शकतो? हा प्रश्न विचारणाऱ्या नागरिकांची संख्या खूपच कमी आहे. ही मानसिकता बदलल्याशिवाय आपण खऱ्या अर्थाने विकसित राष्ट्राच्या दिशेने वाटचाल करू शकत नाही. सार्वजनिक मालमत्तेचा विचार 'आपली' मालमत्ता म्हणून झाला पाहिजे.

आजही आपल्याला बसस्थानकं, शाळा, रस्ते, शौचालयं, उद्याने यांसारख्या सार्वजनिक सुविधा दुर्लक्षित, अस्वच्छ, किंवा नासधूस झालेल्या स्थितीत दिसतात. कारण लोक याकडे सरकारचं आहे म्हणून दुर्लक्ष करतात. पण OECD (Organisation for Economic Co-operation and Development) च्या २०२१ च्या अहवालानुसार, त्या देशांमध्ये सार्वजनिक मालमत्तेला 'आपली मालमत्ता' म्हणून वापरण्याची संस्कृती आहे, तिथे सार्वजनिक सेवा अधिक टिकाऊ, सुरक्षित आणि उच्च दर्जाच्या असतात.

जर आपण आपल्या मुलांना लहानपणापासूनच हे शिकवलं की, शाळेचा कट्टा, बागेची झुला, किंवा सरकारी पाण्याची टाकी ही आपल्या देशाची संपत्ती आहे, आणि तिचं रक्षण करणं आपली जबाबदारी आहे तर भविष्यातील नागरिक अधिक जबाबदार, जागरूक आणि देशहिताकडे झुकणारे असतील.

**दुसरा महत्वाचा मुद्दा म्हणजे मूल्यशिक्षण, विशेषतः नम्रता.**

आजचा काळ हा स्पर्धेचा, धावपळीचा आणि मी-माझं ह्या मानसिकतेचा आहे. अशा वातावरणात नम्रतेचा गुण लोप पावत चालला आहे. UNESCO च्या २०२३ च्या "Values in Education" रिपोर्ट मध्ये नमूद केलं आहे की, ज्या मुलांना लहानपणापासून नम्रता, सहकार्य, आणि सहिष्णुता शिकवली जाते, ते विद्यार्थी भविष्यात नेते, शिक्षक, आणि समाजसेवक बनून अधिक सकारात्मक समाज घडवतात.

नम्रता ही केवळ एक सामाजिक सौजन्यता नाही, ती एक मानसिक अवस्था आहे जिच्या जोरावर समाजात समतेची भावना निर्माण होते. Harvard University च्या एका अभ्यासानुसार, शाळांमध्ये "Character Education" (चारित्र्य विकास शिक्षण) जिथे प्रभावीपणे राबवलं गेलं, तिथे विद्यार्थ्यांमध्ये sempathy, respect, आणि positive behavior मध्ये वाढ दिसून आली.

--------------

■ श्रिजीत राजश्री चेतक भोकरे
१२ वी (विज्ञान शाखा)
मॉडेल ज्युनिअर कॉलेज,
कारंजा घाडगे, जिल्हा वर्धा.
9970591697
bhokareshrijeet@gmail.com

■ ■ ■

# लिव्ह इन रिलेशनशिप विवाह संस्थेला पर्याय ठरू शकत नाही

लग्न न करता एकत्र राहण्याचे ( लिव्ह इन रिलेशनशिप ) फॅड अलीकडे खूप वाढले आहे. विशेषतः शहरात राहणाऱ्या उच्चशिक्षित तरुण तरुणींमध्ये लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहण्याचे प्रमाण अधिक आहे.

लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये काही महिने राहून पहायचे जर एकमेकांचा स्वभाव पटला तर ठीक नाही तर ब्रेक अप करुन पुन्हा नवीन जोडीदार शोधून त्याच्यासोबत लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहायचे असा हा प्रकार. ज्यांना विवाह संस्था मान्य नाही किंवा विवाह करायचा नाही असे तरुण तरुणी लिव्ह इन रिलेशनशिपला पसंती देत आहेत. केवळ अविवाहित तरुणच नाही तर घटस्फोटित व्यक्तीही लिव्ह इनमध्ये राहण्यास पसंती देत आहेत.

लिव्ह इन रिलेशनशिपकडे विवाह संस्थेला पर्याय म्हणून पाहणारा मोठा वर्ग समाजात निर्माण होत आहे. भारतीय कायद्याने लिव्ह इन रिलेशनशिपला पूर्ण मान्यता दिलेली नसली तरी लिव्ह इन रिलेशनशिप कायद्याने बेकायदेशीर किंवा गुन्हाही ठरवलेला नाही. भारतीय कायद्याने या नात्याला काही प्रमाणात संरक्षण आणि अधिकारही दिले आहेत. पण हे करताना कायद्याने काही मार्गदर्शक तत्वेही जारी केली आहेत. लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या जोडप्यांसाठी ही मार्गदर्शक तत्वे पाळणे बंधनकारक आहे.

असे असले तरी या मार्गदर्शक तत्वांचे पालन संबंधित जोडप्यांकडून होते का हा संशोधनाचा विषय आहे. मुळात लिव्ह इन रिलेशनशिपची व्याप्तीच इतकी अस्पष्ट आहे की आपल्या अधिकाराची आणि कर्तव्याची लक्ष्मणरेषाच उभयतांना समजत नाही. त्यामुळे अशा संबंधात कालांतराने कटुता निर्माण होते. दोघांचे पटेनासे होते. विवाह संबंधांमध्ये एकमेकांविषयी जो आदर असतो तो तो लिव्ह इन मध्ये नसतो.



श्याम ठाणेदार
दौंड. जिल्हा पुणे.
९९२२५४६२९५

दोघेही एकमेकांवर अधिकार गाजवण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे वाद वाढत जातात. त्यांच्यात मध्यस्थी करणाराही कोणी नसतो त्यामुळे प्रकरण न्यायालयापर्यंत पोहचते. लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या जोडप्यांचा न्यायालयात पोहचण्याचा प्रकार अलीकडे खूप वाढला आहे.

एकदा वाद न्यायायलात पोहचला की न्यायालयात हेलपाटे घालावे लागतात त्यामुळे संबंधितांचे जीवनही उध्वस्त होते. नातेवाईक, समाजातही अवहेलना होते. काही वेळा तर वाद इतका विकोप्यास जातो की वादातून खुनही होतो.

दोन वर्षांपूर्वी दिल्लीतील श्रद्धा वालावकर या तरुण मुलीचा तिच्याच लिव्ह इन रिलेशनशिपमधल्या जोडीदाराने निर्घृणपणे खुन केला होता. त्या घटनेने संपूर्ण देश हादरला होता. दिल्लीतील या घटनेची नंतर पुण्यातही पुनरावृत्ती झाली होती. लिव्ह इन रिलेशनशिपमधल्या या घटना पाहिल्या की लिव्ह इन मध्ये राहणे किती सुरक्षित आहे याचा विचार तरुणांनी करायला हवा.

लिव्ह इन रिलेशनशिपला कायद्याने बेकायदेशीर ठरवले नसले तरी समाजाने अजूनही या नात्याला मान्यता दिलेली नाही. समाजाने अजूनही लिव्ह इन रिलेशनशिपला स्वीकारले नाही. लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या जोडप्यांकडे समाज समाज कुत्सित नजरेनेच पाहतो. म्हणजे ज्या सुखासाठी लिव्ह इन रिलेशनशिपचा मार्ग स्वीकारला ते सुख तर वाट्याला येतच नाही उलट दुःखच वाट्याला येते.

खरंतर लिव्ह इन रिलेशनशिपला केवळ कायदेशीर दृष्टिकोनातून न पाहता सामाजिक आणि नैतिक दृष्टिकोनातून पाहिले तर कोणीही लिव्ह इन रिलेशनशिपचे समर्थन करणार नाही. स्त्री आणि पुरुष एकमेकांना पूरक असतात आणि त्या पूरकतेला बळ देण्यासाठीच अनादी काळापासून विवाह संस्था अस्तित्वात आली आहे.

विवाह हा मानवी संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. विवाह संस्कृतीत काही त्रुटी असतीलही, विवाह झालेल्या जोडप्यांमध्ये पटत नाही, त्यांच्यात वाद होत नाही असे कोणी म्हणणार नाही. नवरा बायकोमध्येही वाद होतो. काहींचा वाद न्यायालयातही जातो. काहींचा घटस्फोटही होतो म्हणून विवाहच नको, लिव्ह इन रिलेशनशिप विवाह संस्थेला पर्याय आहे असे कोणी समजत असेल तर ते चुकीचे आहे.

लिव्ह इन रिलेशनशिप विवाह संस्थेला पर्याय ठरू शकत नाही. लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये दोन भिन्न लिंगी व्यक्ती एकत्र राहतात पण त्यांना एकमेकांप्रति जबाबदारीचे भान नसते. या उलट विवाह झालेल्या व्यक्तींना एकमेकांप्रति जबाबदारीचे भान असते केवळ जबाबदारीच नाही तर प्रेम, त्याग आणि तडजोडी बरोबरच विवाहात समर्पण भावनाही असते.

मात्र पाश्चिमात्य संस्कृतीचे अंधाणुकीकरण, भौतिकवादी दृष्टिकोन, इतरांपेक्षा काहीतरी वेगळे करून दाखवण्याची प्रवृत्ती यामुळे शहरात विशेषतः मेट्रो शहरात विवाह संस्थेवरच प्रहार केला जात आहे. आजची उच्चशिक्षित तरुण पिढी कोणत्याही जबाबदारी शिवाय बंधनमुक्त जीवन जगण्यास उत्सुक असल्याचे पाहायला मिळत आहे.

त्यामुळेच ते लिव्ह इन कडे वळत आहेत पण ते ही अटी आणि शर्तीवर बेतलेले असल्याने ते संबंधीही फार काळ टिकत नाही त्यापेक्षा समानता, प्रेम, त्याग आणि जबाबदारीची जाणीव असलेला विवाह लिव्ह इन रिलेशनशिपपेक्षा हजारो पटींनी चांगला आहे हे लिव्ह इनकडे वळणाऱ्या तरुणांनी समजून घ्यायला हवे.

# ९० वर्षांची आई आपल्या मुलासाठी बनली वकील

चीनमध्ये, एका ९० वर्षीय आईने आपल्या मुलाला तुरुंगातून सोडण्यासाठी स्वतः कायद्याचा अभ्यास केला आणि नंतर वकील म्हणून न्यायालयात आली. खरंतर, हे प्रकरण ५७ वर्षीय लिनचे आहे, ज्यावर एका श्रीमंत उद्योगपती हुआंगकडून सुमारे १४२ कोटी रुपये उकळल्याचा आरोप आहे.

एप्रिल २०२३ मध्ये, लिनला उद्योगपती हुआंगला ब्लॅकमेल केल्याबद्दल अटक करण्यात आली. २००९ मध्ये हुआंग चीनमधील टॉप-१०० श्रीमंत लोकांमध्ये होता आणि त्यांची एकूण संपत्ती ८०० दशलक्ष युआन होती. लिन आणि हुआंग गॅस उत्पादनात व्यावसायिक संबंधात होते. परंतु हुआंग अनेकदा लिनला पैसे देण्यास उशीर करत असे, ज्यामुळे लिनचा गॅस उत्पादन कारखाना बंद पडला.

वृत्तानुसार, यामुळे संतप्त झालेल्या लिनने २०१४-२०१७ दरम्यान अनियमितता उघड करण्याची धमकी देऊन हुआंगच्या कंपनीला १४२ कोटी रुपये उकळण्यास भाग पाडले.

त्यानंतर, २०२३ मध्ये, हुआंगने लिनविरुद्ध खंडणीसाठी पोलिसात तक्रार दाखल केली.

■ ■ ■




# जेवणाच्या १५ मिनिटे आधी आले, लिंबाचा रस आणि सैंधव मीठ



आपल्या स्वयंपाकघरात असलेल्या अनेक गोष्टी औषधी गुणधर्मांचा खजिना असतात. पोटाच्या समस्येच्याबाबत देखील आपण घरगुती उपायांनी नक्कीच आराम मिळवू शकतो. अनेकदा आपण असंही ऐकलं असेल की जेवणाच्या अधार्तास आधी पाणी प्या किंवा जेवण झाल्यावर अधार्तासानंतर पाणी प्या. त्यामागे केलेल्या जेवणाचे नीट पचन व्हावं हाच उद्देश असतो.

जेवणाआधी १५ मिनीटे आधी आले, लिंबू आणि सैंधव मीठ खावं असं म्हटलं जातं.दिसायला हा फार सामान्य उपाय दिसत असला तरी त्याचे फायदे मात्र भरपूर आहेत. विशेषतः, पचन सुधारण्यासाठी हे रामबाण औषधापेक्षा कमी नाहीत. पचन सुधारण्यासाठी असो, रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यासाठी असो किंवा बीपी आणि साखरेसारख्या समस्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी असो, आपल्या स्वयंपाकघरात असलेल्या गोष्टी खूप उपयुक्त ठरू शकतात. आले, लिंबू आणि सैंधव मीठ खाणे.

या तिन्ही गोष्टी गुणधर्मांचा खजिना आहेत आणि त्या एकत्र घेतल्यास त्या आरोग्य टॉनिकसारखे काम करतात. विशेषतः, पचन सुधारण्यासाठी ते रामबाण औषधापेक्षा कमी नाही.

**खाण्याची पद्धत** : १ इंचाचा आल्याचा तुकडा किसून घ्यायचा आहे. त्यात अर्धा चमचा लिंबाचा रस आणि चिमूटभर सैंधव मीठ घालून जेवणाच्या १५ मिनिटे आधी याचे सेवन करा. यामुळे भूक वाढते आणि पाचक एंजाइम सक्रिय होतात, ज्यामुळे पचन सुधारते.

आल्यामध्ये असलेले जिंजरॉल आणि लिंबामध्ये असलेले सायट्रिक ॲसिड पचन सुधारते. सैंधव मीठ पाचक रसांना देखील उत्तेजित करते, जे अन्नाचे योग्य पचन करण्यास मदत करते. पोटात आम्लता आणि पोटफुगी टाळता येते आणि पोटात गॅसही तयार होत नाही. शरीर डिटॉक्स होते, फॅटी लिव्हरची समस्या कमी होते आणि लिव्हर निरोगी होते.

जेवल्यानंतर पोटात जडपणा जाणवणाऱ्यांसाठी ही रेसिपी एक रामबाण उपाय आहे. जेवणाच्या १५ मिनिटे आधी ते घेतल्याने चयापचय सुधारतो, चरबी जाळण्याची प्रक्रिया वेगवान होते, जास्त खाण्यापासून रोखले जाते आणि वजन कमी होते. यामुळे शरीराला अन्नातील पोषक तत्वे योग्यरित्या शोषण्यास मदत होते. दररोज याचे सेवन केल्याने रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते.

■ ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### जेष्ठाय नमो नमः

कुटूंबात व समाजात
जेष्ठांना द्यावा आदर
त्यांच्या अनुभवाचा
करून घ्यावा वापर..

ठेच खाऊन शहाणं व्हावं
असं नसते काही
मागच्याला ठेच पुढचा शहाणा
म्हणती ते खोटं नाही ..

तरुणांनी जेष्ठांना कार्यात
करून घेतलं सहयोगी
तर कौटूंबिक सामाजिक
वातावरण राहतं निरोगी..

## पर्युषण पर्वासाठी २० ते २७ ऑगस्टपर्यंत कत्तलखाने बंद ठेवण्याचे महापालिका आयुक्तांचे आदेश

**अकोला :** जैन समाजाचे पर्युषण महापर्व साजरे होत आहे. या पार्श्वभूमीवर, अकोला महानगरपालिका आयुक्तांनी २० ते २७ ऑगस्टपर्यंत मनपा हद्दीतील सर्व कत्तलखाने बंद ठेवण्याचे आदेश जारी केले आहेत.पर्युषण पर्व २० ते २७ ऑगस्टदरम्यान मोठ्या श्रद्धेने आणि उत्साहात साजरा केले जात आहे. हा आठवडा धार्मिक विधी, तपस्या आणि संयमाचे पालन करण्यासाठी विशेष असतो. या काळात जैन समाजाने अकोला महानगरपालिका आयुक्तांना निवेदन सादर केले होते. या निवेदनात २० ते २७ ऑगस्ट या कालावधीत मांस विक्रीची दुकाने आणि प्राणी कत्तलखाने पूर्णपणे बंद ठेवावेत, अशी विनंती करण्यात आली होती.

## पातूर धाब्यावर चोरट्यांचा धुमाकूळ

### ▪तीन बार फोडून लाखोंची चोरी एक ठिकाणी प्रयत्न असफल

▪**पातुर,दि २० (प्रतिनिधी) :**

पातूर-वाशीम महामार्गावरील रेस्टॉरंट आणि बिअर बारवर मध्यरात्री चोरट्यांनी धुमाकूळ घालत तब्बल तीन बारमधून लाखो रुपयांची रोकड लंपास केली. तर एका बिअर शॉपीत चोरीचा प्रयत्न अपयशी ठरला. ही घटना गुरुवारी मध्यरात्री १ ते २ वाजताच्या दरम्यान घडली.

**चोरीची सविस्तर माहिती**

वाशीम मार्गावर असलेल्या प्यालेस वाईन बार चे मागील शटर वाकवून चोरट्यांनी आत प्रवेश केला व तेथून ३५ हजार रुपये चोरून नेले. त्याच बाजूला असलेल्या पूर्वी बिअर शॉपी मधून ४८ हजार रुपये तर राणा बार मधून तब्बल दीड लाख रुपये असा मिळून लाखोंचा ऐवज अज्ञात चोरट्यांनी लंपास केला.तर मनप्रीत बिअर शॉपी मध्ये चोरट्यांनी प्रवेश करण्याचा प्रयत्न केला मात्र तो अपयशी ठरला.

घटनेची माहिती मिळताच ठाणेदार हनुमंत डोपेवाडे यांच्यासह हे. कॉ. संबोधी इंगळे, वसीम खान, साबे मेजर, चौधरी मेजर यांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. यावेळी अकोला येथील ङउइ च्या पथकाने देखील घटनास्थळाची पाहणी करून माहिती घेतली. वृत्त प्रकाशित होईपर्यंत पातूर पोलिसांत गुन्हा दाखल प्रक्रिया सुरू होती.

या संपूर्ण घटनेत चोरट्यांनी नीट रेकी करूनच दरोडा टाकल्याचे स्पष्ट झाले आहे. चोरीपूर्वी चोरट्यांनी बिअर शॉपी व बारचा विद्युत पुरवठा खंडित करून उउढत कॅमेऱ्याचे रेकॉर्डिंग बंद पडावे याची काळजी घेतली. यामुळे पोलिसांच्या तपासात अडथळा निर्माण झाला आहे.

पूर्वी बिअर शॉपीचे मालक व भाजपचे उपाध्यक्ष सचिन बारोकार यांनी सांगितले की,ङ्गचोरट्यांनी आधी रेकी करून माहिती जमवली व नंतर वीज पुरवठा बंद करून हा दरोडा टाकला. त्यामुळे पोलिसांनी या भागात गस्त वाढवावी व तात्काळ चोरट्यांना पकडून कारवाई करावी,ङ्घ अशी मागणी केली आहे.

# गणेश उत्सवासाठी सुरक्षेला प्राधान्य देत अधिकृत वीज जोडणी घ्या

## सार्वजनिक गणेश मंडळांना घरगुती दराने वीजपुरवठा

▪**अकोला,दि २० (प्रतिनिधी) :**

सार्वजनिक गणेश मंडळांना महावितरणकडून तात्पुरत्या स्वरूपात आणि त्वरित वीज जोडणीची सुविधा उपलब्ध केली आहे. या जोडणीसाठी घरगुती वीजदर आकारण्यात येणार आहे. तरी सार्वजनिक गणेश मंडळांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन अकोला परिमंडलाचे मुख्य अभियंता राजेश नाईक यांनी केले आहे.

**आवश्यक कागदपत्रे**

गणेश मंडळांना तात्पुरत्या स्वरूपातील वीज जोडणीसाठी नोंदणी प्रमाणपत्र, स्थानिक स्वराज्य संस्था मंडप परवानगी, पोलिस स्थानक परवाना, विद्युत निरीक्षक यांचे वीजसंच सुरक्षित असल्याचे प्रमाणपत्र, वीज मागणी अर्ज, वीजसंच मांडणी चाचणी अहवाल व राष्ट्रीयकृत बँक खाते पासबुक छायांकित प्रत इ. कागदपत्रे आवश्यक आहेत. गणेश मंडळांनी आवश्यक कागदपत्रासह नजीकच्या महावितरण कार्यालयाशी संपर्क साधावा.

**उत्सव काळात सुरक्षा महत्वाची**

गणेशोत्सव काळात कोणत्याही प्रकारचा वीज अपघात होऊ नये यासाठी मंडप, रोषणाई व देखाव्यांची उभारणी करताना लघुदाब व उच्चदाब विद्युत वाहिन्या, वितरण रोहित्रे इ. यंत्रणेपासून सुरक्षित अंतर राखावे. मंडपातील वीजसंच मांडणी करताना विद्युत सुरक्षा नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. मंडपातील वीजसंच मांडणी मान्यताप्राप्त विद्युत ठेकेदारांकडून करून घेण्यात यावी. गणेश मंडळांनी विद्युत सुरक्षा उपाययोजनांमध्ये तडजोड करू नये. आपात्कालीन स्थितीकरिता कार्यक्षेत्रातील महावितरणच्या शाखा अभियंत्यांचे मोबाईल क्रमांक नोंदवून ठेवावेत.

**संपर्कासाठी स्थानिक नियंत्रण कक्ष**

आपत्कालीन परिस्थितीत संपर्क करण्यासाठी महावितरणचे स्थानिक नियंत्रण कक्षाचे ७८७५७६३३३९ ( अकोला), ७८७५७६३४८५ (बुलडाणा) आणि ७८७५७६३२७६ क्रमांक ग्राहकांच्या सेवेत २४ तास उपलब्ध आहेत, अशी माहिती मुख्य अभियंता राजेश नाईक यांनी दिली

**अनामत रक्कम मिळणार विनाविलंब परत**

तात्पुरत्या वीजजोडणीसाठी गणेश मंडळांना मंजूर वीजभारानुसार अनामत रक्कम भरणे आवश्यक आहे. ही रक्कम ऑनलाईन भरल्यास गणेशोत्सव संपल्यावर वीजबिलाची रक्कम वगळून उरलेली रक्कम विनाविलंब परत केली जाईल. त्यामुळे गणेश मंडळांनी अनामत रक्कम ऑनलाईन पद्धतीनेच भरावी, असे आवाहनही महावितरणकडून करण्यात आले आहे.

## अवैध गावठी दारू हातभट्टीच्या गुत्ता वर रेड करून ३९०० रुपयाचा मुद्देमाल नाश

▪**अकोला,दि २० (प्रतिनिधी) :**



मा. श्री. अर्चित चांडक, पोलीस अधीक्षक, अकोला यांचे निर्देशाप्रमाणे अकोला जिल्हयामध्ये अवैध धंदे समूळ नष्ट करण्यासाठी ऑपरेशन प्रहार मोहीम राबविण्यात येत आहे.आज दि.२०/०८/२०२५ पो.स्टे बार्शीटाकळी हद्दीतील ग्राम कोथळी बु येथे आज दि. २०/०८/२०२५ रोजी पंचांसमक्ष्य रेड केली.

आरोपी नामे अजय भीमराव वरठे वय ४० वर्ष रा. कोथळी बु ता. बार्शीटाकळी, जि. अकोला याचे कबज्यात अवैधरित्या सडवा मोहमाचं एकूण अं २१० लिटर किंमत ३१,५००/- रुपये व गावठी हातभट्टी दारु अं ४० लिटर की अं ८,०००/-रुपये असा एकूण ३९,५००/- रुपये चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी विरुद्ध पो स्टे बार्शीटाकळी येथे कलम ६५ ई, क, ड, फ दारु बंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात येत आहे.सदरची कारवाई माननीय पोलीस अधीक्षक श्री अर्चित साहेब चांडक, अपर पोलीस अधीक्षक श्री बी. चंद्रकांत रेड्डी साहेब, पोलीस निरीक्षक अधिकारी श्री शंकर शेळके स्थानिक गुन्हे शाखा अकोला यांच्या मार्गदर्शनात झडख बोडखे ऋझडख दशरथ बोरकर, कउ गोकुळ चव्हाण, झउ अन्सार बन १३७८, झउ स्वप्नील ब नं ३०व चालक पो का मनीष ठाकरे ब नं ९४३ केली आहे.

## साधूत्वा साठी देव मान्यतेची गरज : ज्ञानेश्वर महाराज वाघ

▪**अकोला,दि २० (प्रतिनिधी) :**



नव्हती संत माळामुद्रांच्या भूषणें श्र भस्म उधळणें नव्हती संत श्रश्र लोकांना फक्त बाह्य लक्षण कळतात स्वरूप नाही. माळा मुद्रा हे भक्ती क्षेत्रातील साधुत्वाचे बाह्य लक्षण आहेत ते भक्तीचे स्वरूप नाही. म्हणून अभिनयाने अर्थातच बाह्य वेषाने साधू दिसणे सोपे आहे परंतु अंतर्मनाने म्हणजेच अभिजात ( जातिवंत ) साधू होणे अत्यंत कठीण असते. कारण देश , वेष , भाषा , नाम , गृह व आश्रम परिवर्तन करणे हा साधूत्वाचा परिमाण ( मोजमाप )नसून , चित्तात अमुलाग्र बदल होऊन हृदय परिवर्तन होणे हाच खरा व खऱ्या साधत्वाचा निकष आहे. कारण उपरोक्त परिवर्तनाने लोकमान्यता मिळवता येते , देव मान्यता नाही. साधूत्वा साठी लोकमान्यतेची किंवा राजमान्यतेची नाही तर, देव मान्यतेची नितांत गरज असते.

आजकाल मात्र धन दांडगे लोक ज्याच्या मागे पुढे फिरतात त्यांना मोठा साधू समजण्याचा समाजात प्रभात निर्माण झालेला आहे. वास्तविक पाहता धनवान फक्त पैशाला ओळखतो तो साधूला कधीच जाणू शकत नाही.

तो फक्त साधुनी केलेल्या चमत्कारावर भाडतो आणि स्तुती करणाऱ्या स्तुती पाठक साधूच्या चरणावर लोडतो . या भाडणाऱ्या व लोढणाऱ्यांना सोडतो आणि शुद्ध परमार्थिकांना जो जोडतो त्याच जातीवंत साधूंना परमात्मा भावबळाने आकडतो वेशधारी (नौटंकीबाजांना) नाही. तुका म्हणे वेषधारी श्र हिजड्या नव्हती त्या नारी लोकमान्यतेने मिळवलेले साधुत्व हे क्षणभंगुर असल्याने जास्त दिवस टिकत नाही. कारण लोकमान्यता हे कुणाचीही वतनदारी नसल्यामुळे ते नेहमी झाडाच्या सावली प्रमाणे जागा बदलत राहते. म्हणूनच पहिल्या पंचवार्षिक मध्ये बहुमताने निवडून आलेला दुसऱ्यांदा आपली अनामत रक्कम सुद्धा राखू शकत नाही हा इतिहास आहे. तसेही ज्याला संपूर्ण जग मानत त्याला देव मानतच असेल असे नाही. किंबहुना ज्याला जग मानत किंवा जाणत तो साधून नसून , ज्यांनी जगाला जाणले तोच खरा साधू होय. खऱ्या साधूला जग काय कदाचित स्वतःच्या घरातील लोकही मानत नसतील . परंतु त्याला प्राप्त झालेली देव मान्यता हीच त्याच्याकरिता सर्वोच्च प्रशस्ती ( गौरव ) आहे.

लोकमान्यता हा राजकारणाचा भाग आहे साधुत्वाचा नाही. म्हणून जे साधू लोकमान्यता , प्रसिद्धी व पुरस्काराकरिता धडपडत असतील ते परमार्थातील राजकारणी आहेत. एखाद्या राजकारण्यात साधुत्व असेल तर , त्याचे सहर्ष स्वागतच आहे. मात्र साधुत्वाच्या नावा व वेषा खाली राजकारण नसावे. राजकारणातही साधूत्व असल्यामुळेच छत्रपती शिवाजी महाराज हे सृष्टीच्या आरंभापासून आजतागायत झालेल्या सर्वच राजा मधील संत ठरतात तर , साधुत्वाच्या आड राजकारण करणारे मात्र रामायणातील कलियुगीन कालनेमी होत. म्हणून जातिवंत साधुनी आपल्या साधुत्वाचा व्यक्तिगत स्वार्थाकरिता किंवा राजकारणा साठी उपयोग न करता धर्म , आत्म व समाजोद्धाराकरिता करावा.

ॲ सत्ता ( राजकारण ) आणि सत्य ( धर्मकारण ) यातील संघर्ष सत्तांतराला कारणीभूत झाल्याचे अनेक उदाहरणे आहेत. म्हणून त्यातून धडा घेऊन त्यातील संघर्ष कमी करून , समाज हिताकरिता त्यांच्यामध्ये समन्वय घडवून आणल्या गेला पाहिजे. कारण सत्ता आणि सत्य हातात हात घेऊन चालल्यास समाज परिवर्तनासाठी वेळ लागणार नाही .

## ब्रह्माकुमारीजब तर्फे गिनीज बुक साठी रक्तदान अभियान

▪**अकोला,दि १९ (प्रतिनिधी) :**

प्रजापिता ब्रह्माकुमारीजब तर्फे गिनीज बुक रेकॉर्ड



साठी दादी प्रकाशमणीजी यांच्या पुण्यतिथी निमित्य शनिवार दि. २३ ऑगष्ट रोजी संपूर्ण भारतवर्षातील ३००० सेवा केंद्रावर एकाच दिवशी रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात येत आहे.

आपल्या अकोला शहरातही या रक्तदान शिबीराचे आयोजन शनिवार दि.२३ ऑगष्ट ला ब्रह्माकुमारीजब च्या किर्तीनगर, गौरक्षण रोड स्थित सेवा केंद्रावर सकाळी १० ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत करण्यात आले आहे.

या प्रसंगी ब्रह्माकुमारीजब ने म्हटले की, आपले रक्त जीवनाचे वरदान आहे, हे जीवन वाचवू शकते, आशा जागवू शकते व अनोळखी लोकांना एकत्र करू शकते. रक्तदानामुळे कोणाला जीवनाची आणखी एक संधी पण मिळू शकते.' एक थेंब अनंत आशिर्वाद, दाता बना, दिव्य बना' या स्लोगन सोबत सबझोन इंचार्ज ब्रह्माकुमारी रूक्मीणी दिदी यांनी समस्त अकोला वासियांना आवाहन केले आहे की, आपण सर्वांनी मोठ्या संख्येने या पुण्य कार्यासाठी लाभाचा वाटा उचलावा व हे अभियान यशस्वी बनविण्याकरीता सहकार्य करावे.

## कृत्रिम फुलांवर बंदी घालून पोटावर मारू नका

### मंडप बिछायत असोसिएशनचे मुख्यमंत्र्यांना साकडे



▪**तेल्हारा,दि १९ (प्रतिनिधी) :**

आर्टिफिशल फुलांवर बंदी घालण्याचा शासनाचा प्रयत्न सुरू असल्याने हजारो कामगारांवर उपासमारीची वेळ येणार आहे. त्यामुळे कृत्रिम फुलांवर बंदी घालू नये असे साकडे मुख्यमंत्र्यांना घालण्यात आले आहे.कृत्रिम फुलांवर बंदी घालावी अशी मागणी शासनाकडे, काही संघटनांनी केली होती. त्या दृष्टीने कृत्रिम फुलांवर बंदी घालण्याचे प्रयत्न शासनाकडून सुरू आहेत.पण दुसरीकडे ऑल टेन्ट डिलर वेल्फेअर ऑर्गनायझेशन, महाराष्ट्र हि संघटना, लग्न व शुभ कार्यासाठी काम करणाऱ्या (इव्हेंट मॅनेजमेंट) व्यवसायातील एक अग्रगण्य संघटना असून या संघटनेच्या माध्यमातुन या व्यवसायात काम करणाऱ्या बेरोजगारांच्या अडीअडचणी सोडवण्याचे कार्य केल्या जाते.आर्टिफिशल फुलाच्या माध्यमातुन लग्न व शुभ कार्यासाठी तसेच इतर सार्वजनिक उत्सवा प्रसंगी डेकोरेशनच्या माध्यमातुन लाखो बेरोजगारांना रोजगार मिळवून दिल्या जातो. आर्टिफिशल फुलावर बंदी घातल्यास, या क्षेत्रातील लाखो कामगार बेरोजगार होतील, ह्या चिंते पोटी कृत्रिम फुलांवर बंदी घालू नये अशी मागणी संघटनेच्या माध्यमातून राज्यभरात करण्यात येत आहे. तेल्हारा तालुका मंडप डेकोरेशन, बिछायत, लाईट साउंड असोसिएशन यांच्यातर्फे सुद्धा मुख्यमंत्र्यांकडे कृत्रिम फुलांवर बंदी न घालण्याची मागणी करण्यात आली आहे. देवी-देवतांच्या पुजेसाठी व लग्नविधी व इतर सण उत्सवासाठी गुलाब, झेंडू, निशिगंध, मोगरा, तगर, नवरंग इत्यादी नैसर्गिक फुलांचाच पुजेसाठी वापर केल्या जातो, हि सर्वमान्य वस्तुस्थिती आहेच आहे. परंतु, त्यात आर्टिफिशियल फुले वापरली जात नाहीत. त्यामुळे नैसर्गिक फुले उत्पादक शेतकऱ्यांवर तसेच विक्रेत्यांवर कोणताही परिणाम होणार नाही. सदर निवेदन तेल्हारा तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्र्यांना पाठविण्यात आले आहे

## अकोला जिल्ह्यातील राष्ट्रीय आरोग्य अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या बेमुदच आंदोलनाला पाठिंबा



▪**अकोला,दि १९ (प्रतिनिधी) :**

राष्ट्रीय आरोग्य अभियान अधिकारी व कर्मचारी एकत्रीकरण व एकता संघ समिती एन एच एम संघटना अकोला त्यांच्या वतीने १९ ऑगस्ट पासून जिल्हा अधिकारी कार्यालय समोर अकोला येथे नियमित शासन सेवेत समायोजन, बदली धोरण, वेतन वाढ, अपघात विमा इत्यादी मागणीसाठी सुरु असलेला काम बंद आंदोलनाला. महाराष्ट्र राज्य नर्सेस व आरोग्य कर्मचारी संघटना र.न. ३८८१ या संघटनेच्या वतीने जिल्हाध्यक्ष संगीताताई जाधव यांनी आंदोलन मंडपात कृती।समितीच्या पदाधिकारी यांना पाठिंबा जाहीर केला आहे. तसेच मनोबल वाढवण्यासाठी त्यांना मार्गदर्शन केले.अशाच प्रकारे आपल्या हितासाठी अधिकारासाठी हक्कासाठी न्यायासाठी कायमस्वरूपी जिद्दीने आंदोलन सुरू ठेवा निर्णय तर राज्य शासनाच्या परिपत्रकानुसार करण्यात येईलच.

आंदोलनाच्या दरम्यान संघटना अध्यक्ष संगीता जाधव यांनी पाठिंबा आंदोलनाला जाहीर केला. यावेळी डॉ. रामनागे,मनोज कडू,गोपाल अंभोरे, उमेश ताटे, सचिन उनवणे, इमरान खान, परिमल फुके, नाना चव्हाण, डॉ. अश्विन तिवारी, तनवीर खान, महेंद्र कोलटक्के, ॲड शुभांगी खांडे, तृप्ती तायडे, स्वाती अस्वरे, डॉ. भाग्यश्री गोरटे डॉ. सपना बाटे,, डोळस, धुमाळे, थाठे सर, व इतर अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

**CHANGE IN NAME**

I Have Change My Name in my Passport No is E3280932 ----From----- **FARIDA BEE SHAIKH INAIT KHAN** ------TO------- **FARIDA BI SHE INAYAT** My Residential Address is - Khyaja Nagar Sontakke Plot Akola 444002

**CHANGE IN NAME**

I Have Change My Name in My Passport No is R7807780 -------From---------- **AYASHA ANAHAR** ---------TO------------ **AYESHA ANHAR SALIM AHMED** My Residential Address is - Rahat Medical Khair Mohammed Plot Old City Chhabnama Nagar Akola 444002.

**CHANGE IN NAME**

I Have Change My Name in My Daughter Passport No is - **(R7807780)** -------From---------- **SALIM AHEMED** ---------TO------------ **SALIM AHMAD ABDUL RAHIM PANDE** My Residential Address is - Rahat Medical Khair Mohammed Plot Old City Chhabnama Nagar Akola 444002.

**CHANGE IN NAME**

I Have Change My Name in My Daughter Passport No is - **(R7807780)** -------From---------- **NAJANIN BANO** ---------TO------------ **NAZNEEN BANO SALIM AHMAD PANDE** My Residential Address is - Rahat Medical Khair Mohammed Plot Old City Chhabnama Nagar Akola 444002.

### संत ज्ञानेश्वर महाराज जन्मोसप्तोशतकोत्तर सुवर्ण महोत्सव जयंती निमित्त

## महीला भजनी मंडळास ठाळ वाटप व भव्य दिंडी सोहळा

▪**हिवरखेड,दि २०(प्रतिनिधी) :**



हिवरखेड येथील वीठ्ठल रुखमीनी मंदीर समीती ट्रस्टी तर्फे लोकसहभागातुन आज स्वातंत्र दिनी संत ज्ञानेर्श्वरराचे सातशे पन्नास वर्षापुर्वी १५/८/१२७५ ला रात्री बारा वाजता झाला तर आजच कृष्णजन्माष्टमी सूद्दा आहे तर आजचेच दिवशी १५ आगष्ट १९४७ ला रात्री बारालाच हिंदुस्थान स्वातंत्र झाला हा दुग्धशर्करा योग असून महाराष्ट शासना कडून सर्व शाळामधे १४/८/ला पसायदान म्हनन्याचे पत्रक सुद्दा काढले याबद्दल सरकारचे अभिनंदन केले सनातन धर्माची परपंरा जोपासन्याचे कार्य संतमतातुन त्यांचे कार्याची ज्ञानाची महती जोपासन्याचे कार्याचे ज्ञानार्जन महिला मंडळी कडून आपल्या पाल्याप्रती व्हावे असे ज्ञानेश आश्रम वारीचे ज्ञानेर्श्वरी मर्मज्ञ ज्ञानेर्श्वर वाघ महाराज यांनी पांडुरंग कृपा मगल कार्यालयात आयोजीत सेवा निवृत पोलीस अमलदार महादेव नेवारे सौ अनिता नेवारे तसेच सौ हिवरेताई व पुंडलिक हिवरे याचा सपत्निक सत्कार समीतीचे ट्रस्टी सत्तुभाई र्गिहे, आनंद बोहरा, परसराम राऊत रवी दवे, प्रकाश बोंबटकार शंकरराव देशमूख हस्ते करन्यात आला तसेच या कार्यक्रमात मचंकावर पोलीस पाटील प्रकाश गावंडे शामशिल भोपळे प्रवीन येऊल बाळासाहेब नेरकर कौसल साहेब, हे उपस्थित होते .

## पर्वतराव राजाराम विखे यांचे निधन

**तेल्हारा :** येथील प्रतिष्ठित नागरिक उद्धवराव विखे व माधवराव विखे यांचे वडील सेवानिवृत्त मुख्याध्यापक पर्वतराव राजाराम विखे यांचे वृद्धापकाळाने आज दिनांक २० ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी चार वाजता दुःखद निधन झाले आहे त्यांची अंत्ययात्रा उद्या शुक्रवार दिनांक २१ ऑगस्ट रोजी सकाळी ठीक अकरा वाजता त्यांचे घरून वैकुंठ धाम तेल्हारा येथे राहील.



## शहरात पिण्याच्या पाण्याचा अपव्यय

**अकोला :** शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या काटेपूर्णा धरणात पाणीसाठा कमी होत असून पाणीपुरवठ्याचे वेळापत्रक दर पाचव्या दिवशी करण्यात आले आहे. नळ तीन ते चार तास सुरू राहत असल्याने पाण्याचा मोठ्या प्रमाणात अपव्यय केला जात आहे. नळ आल्यानंतर नागरिक व बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची नासाडी सुरू आहे.

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, अकोला**

मुर्तिजापूर रोड, अकोला - 444001

वेब पत्ता : mjp.maharashtra.gov.in

ई-मेल : ee.akola@mjp.gov.in, eemjpda@rediffmail.com

जा.क्र. / निविदा २०४७/२०२५

दिनांक : २०/०८/२०२५

**ई-निविदा सुचना क्र. २४ सन २०२५ - २०२६**

लंघापूर व ५७ खेडी पादेशिक पाणी पुरवठा योजनेचे देखभाल व दुरुस्ती अंतर्गत वेगवेगळ्या व्यासाच्या पाईपलाईनची दुरुस्ती करणे व मनुष्यबळ पुरविणे बाबत. ता. मुर्तिजापूर, जि. अकोला या कामाची निविदा म.जी.प्रा. विभाग, अकोला यांचे कडुन मागविण्यात येत आहे. सदर कामाची अंदाजीत किंमत रु. १,०६,९९,२०७/- आहे. सदर कामाची ई-निविदा म.जी.प्रा. कडुन मागविण्यांत येत आहे. सदर निविदाचा सविस्तर तपशील दि. २१.०८.२०२५ पासुन www.mahatenders.gov.in या वेबपोर्टलवर उपलब्ध राहील. ई-निविदा प्रक्रिया कार्यक्रमाचा सर्व तारखा www.mahatenders.gov.in या वेबपोर्टलवर अपलोड करण्यात आलेल्या ऑनलाईन निविदा सुचनेनुसार राहतील.

दिनांक :


कार्यकारी अभियंता

मजीप्रा विभाग, अकोला

RNINO-46973/1986 महासागर अकोला मालक,मुद्रक,प्रकाशक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्केअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले. संपादक श्री**कृष्ण तनसुखदास चांडक** मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९७००२३+स्थानिक संपादक **पुरुषोत्तम ढोले** फोन ९८८१४८९४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)




# हिपॅटायटीस ठरू शकतो जीवघेणा



**व्याधी विचार**
**डॉ. दिलीप शिरसाट**

हिपॅटायटीस हा एक आजार आहे. त्यात यकृताला सूज येते आणि कधीकधी तो प्राणघातक ठरू शकतो. ही सूज सहसा विषाणूमुळे होते; परंतु अल्कोहोल, खाण्याच्या चुकीच्या सवयी, काही औषधे हीदेखील त्यामागील कारणे असू शकतात.

लोक या आजाराबद्दल अनेकदा गोंधळलेले असतात. हिपॅटायटीस म्हणजे यकृतात सूज येणे. ही सूज विषाणूमुळे होते आणि वेळेवर उपचार न केल्यास यकृत निकामी होणे, यकृताचा कर्करोग यासारखे गंभीर आजार होऊ शकतात. हिपॅटायटीसचे ५ मुख्य प्रकार आहेत ज्यात ए, बी, सी, डी आणि ई यांचा समावेश आहे; परंतु यापैकी हिपॅटायटीस बी आणि सी सर्वात धोकादायक मानले जातात. कारण ते शरीरात बराच काळ राहतात आणि हळूहळू यकृताचे नुकसान करू शकतात.

हिपॅटायटीस कोणालाही होऊ शकतो; परंतु काही कारणांमुळे ते वेगाने पसरते. घाण अन्न, संक्रमित रक्त किंवा सुयांचा वापर, संक्रमित आईपासून बाळापर्यंत किंवा माती यामुळे तो पसरतो.

**हिपॅटायटीसची लक्षणे**

हिपॅटायटीसची लक्षणे सुरुवातीला अगदी सामान्य असू शकतात; परंतु जेव्हा तो गंभीर होतो, तेव्हा थकवा आणि अशक्तपणा, भूक न लागणे, पोटदुखी किंवा सूज, उलट्या किंवा अतिसार, गडद रंगाचा मूत्र, कावीळ आणि ताप अशी लक्षणे दिसतात. कधीकधी हा आजार कोणत्याही लक्षणांशिवायदेखील होऊ शकतो आणि हळूहळू यकृताचे नुकसान करत राहतो. म्हणून, वेळोवेळी तपासणी करणे महत्वाचे आहे.

# तीस टक्के महिला अशक्तपणाच्या बळी



**आरोग्य वार्ता**
**डॉ. कुंदन गायकवाड**

लोहाची कमतरता ही एक मोठी समस्या बनत आहे. तीस टक्के महिला अशक्तपणाच्या बळी आहेत. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार, प्रत्येक तिसरी महिला लोहाच्या कमतरतेची बळी आहे.

महिलांमध्ये लोहाची कमतरता ही एक सामान्य; परंतु अनेकदा दुर्लक्षित आरोग्य समस्या बनली आहे. विशेषतः पुनरुत्पादक वयाच्या महिलांमध्ये ही कमतरता गंभीर अशक्तपणासारखी स्थिती निर्माण करते. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार, भारतातील सुमारे ३० टक्के महिला आणि ३७ टक्के गर्भवती महिला अशक्तपणाने ग्रस्त आहेत. लोहाच्या कमतरतेच्या सुरुवातीच्या टप्प्यात, लक्षणे इतकी सौम्य असतात, की महिला अनेकदा त्याकडे दुर्लक्ष करतात किंवा डॉक्टर त्यांना काही सामान्य थकवा किंवा निर्जलीकरणाशी जोडतात. अशा परिस्थितीत, काही तज्ज्ञांचा असा विश्वास आहे, की फक्त रक्तातील लोहाचे प्रमाण तपासणे पुरेसे नाही. त्याच वेळी, काही डॉक्टर फक्त सीरम किंवा लोह रक्त संख्या पाहतात; परंतु शरीरात लोह साठवणाऱ्या फेरिटिनची तपासणी करणे खूप महत्वाचे आहे. कधीकधी सीरममध्ये लोह सामान्य असते; परंतु फेरिटिन खूप कमी असते. त्यामुळे थकवा, चक्कर येणे आणि हातपाय थंड होणे अशी लक्षणे दिसतात.

**लोहाच्या कमतरतेचा शरीरावर परिणाम**

शरीराला निरोगी लाल रक्तपेशी बनवण्यासाठी लोहाची आवश्यकता असते. या पेशी हिमोग्लोबीनने समृद्ध असतात. त्या शरीराच्या प्रत्येक भागाला ऑक्सिजन पोहोचवण्याचे काम करतात. जेव्हा लोहाची कमतरता असते, तेव्हा हिमोग्लोबीनचे उत्पादन कमी होते. त्यामुळे शरीरात ऑक्सिजनचा पुरवठा प्रभावित होतो आणि व्यक्ती अशक्तपणाला बळी पडते.

**लोहाची कमतरता दर्शविणारी चिन्हे**

✲ **सतत थकवा आणि ऊर्जेचा अभाव**: जर एखाद्या महिलेला पुरेशी झोप झाली असली, तरीही तिला नेहमी थकवा जाणवत असेल तर ते हलक्यात घेऊ नये. हे लोहाच्या कमतरतेचे एक महत्त्वाचे लक्षण असू शकते. म्हणूनच, हे बहुतेकदा तणाव, झोपेची कमतरता किंवा कामाच्या ओझ्याशी संबंधित असते; परंतु शरीराकडून हा एक इशारादेखील असू शकतो.

✲ **चक्कर येणे**: लोहाच्या कमतरतेमुळे शरीरातील हिमोग्लोबीनचे प्रमाण कमी झाल्यावर ऑक्सिजन पेशींपर्यंत योग्यरित्या पोहोचू शकत नाही. यामुळे, उभे राहताच चक्कर येणे किंवा चालताना थोडीशी चक्कर येणे सामान्य होते. बऱ्याचदा लोक ते डिहायड्रेशन समजून दुर्लक्ष करतात, तर ते निमियाचे लक्षण असू शकते.

✲ **पायांना थंडी वाजणे**: जर तुमचे हात आणि पाय उष्ण हवामानातही थंड राहिले, तर ते शरीरात लोहाची कमतरता असल्याचे लक्षण असू शकते. लोहाची कमतरता रक्ताभिसरण आणि शरीराचे तापमान नियंत्रणावर परिणाम करते. रक्ताभिसरणाचा विषय समजून अनेकदा त्याकडे दुर्लक्ष केले जाते; परंतु प्रत्यक्षात ते अंतर्गत कमकुवतपणाचे लक्षण आहे.

**चाचणी कधी करावी?**

वर उल्लेख केलेल्या लक्षणांपैकी कोणतीही लक्षणे जाणवत असतील, तर केवळ लोहाची पातळीच नाही, तर फेरिटिनची चाचणी करा. हे शरीरात लोह साठवणुकीचे सूचक आहे. डॉक्टर अनेकदा या चाचणीकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे योग्य निदान शक्य होत नाही. दुसरीकडे, लोहाची कमतरता हलक्यात घेणे धोकादायक ठरू शकते. विशेषतः ज्या महिला आधीच हार्मोनल बदल आणि मासिक पाळीसारख्या परिस्थितीतून जात आहेत, त्यांच्यासाठी हा धोका जादा आहे.

# बिस्कीट खाताय, सावधान!



**डाएट स्टोरी**
**डॉ. प्रसन्न नेने**

चहाचा कप असो किंवा ऑफिसमध्ये भूक भागवण्याचा सोपा पर्याय; बिस्किटे जवळजवळ प्रत्येक घराच्या स्वयंपाकघराचा भाग बनली आहेत. मुले असोत किंवा प्रौढ; सर्वांनाच कुरकुरीत आणि गोड बिस्किटे आवडतात; परंतु इतक्या आवडीने खाल्लेले बिस्किट हळूहळू आरोग्याला हानी पोहोचवू शकतात.

बिस्किटे हा सहसा हलका आणि सोयीस्कर नाश्ता मानला जातो; परंतु तज्ञांच्या मते, ते तुमच्या आरोग्यासाठी 'गोड विष' ठरू शकतात. बिस्किटांमध्ये वापरले जाणारे रिफाइंड पीठ, रिफाइंड साखर आणि हायड्रोजनेटेड तेल शरीराचे चयापचय बिघडवू शकतात. बिस्किटांमध्ये रिफाइंड पीठ आणि कमी फायबर असलेल्या पदार्थांमुळे ते सहज पचत नाही. त्याचे सतत सेवन केल्याने बद्धकोष्ठता, गॅस आणि आम्लता सारख्या समस्या वाढू शकतात.


**वजन वाढण्याचा धोका**

बिस्किटांमध्ये लपलेल्या कॅलरीज आणि साखर शरीरात चरबी म्हणून जमा होऊ लागतात. वजन कमी करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांसाठी बिस्किटे खाणे अजिबात योग्य नाही.

**रक्तातील साखरेवर परिणाम**

मधुमेहाच्या रुग्णांनी बिस्किटांपासून दूर राहावे. त्यांचा 'ग्लायसेमिक इंडेक्स' जास्त असतो. त्यामुळे रक्तातील साखरेची पातळी वेगाने वाढू शकते. बिस्किटांमध्ये असलेले 'ट्रान्स फॅट' आणि प्रिझर्व्हेटिव्हज शरीरात हार्मोनल असंतुलन निर्माण करू शकतात. महिलांमध्ये बिस्किटांळे मुरुमे, अनियमित मासिक पाळी आणि थकवा येऊ शकतो.

# पहाटे झोपेतून जाग येणे हे गंभीर आजाराचे लक्षण



**घ्या काळजी**
**डॉ. अजिंक्य बोऱ्हाडे**

रात्री ३ ते ५ वाजण्याच्या दरम्यान झोपेतून जाग येणे ही गोष्ट आता अनेकांसाठी सामान्य बनली आहे. बऱ्याच वेळा आपण याकडे झोपमोड, थोडासा तणाव, चुळबुळ किंवा चहा-कॉफीची सवय म्हणून पाहतो; मात्र तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार, अशा वेळेला सतत जाग येणे केवळ शारीरिक थकवा नाही, तर हे तुमच्या मनातील खोल अस्वस्थतेचे किंवा शरीरातील बिघडल्याचे लक्षण असू शकते.

शास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले तर पहाटे तीन ते पाच वाजण्याच्या वेळेला वुल्फ अवर म्हटले जाते. ही अशी वेळ असते, जेव्हा मेंदू जास्त भावनिक, हार्मोनल आणि मानसिक परिस्थितीत असतो. याच काळात आपल्या मनातले दबलेले विचार, चिंता किंवा काही अज्ञात भावना बाहेर यायला सुरुवात होतात. रोजच पहाटे तीन ते चार वाजण्याच्या दरम्यान जागे होत असाल आणि पुन्हा झोप येत नसेल तर याकडे दुर्लक्ष करू नका. आपल्या झोपेची अनेक चक्र असतात, जसे की हलकी झोप, दीर्घ झोप नंतर 'रेम' (रॅपीड आय मूव्हमेंट)) झोप. या झोपेते स्वप्न पडतात. या चक्रात एखाद-दुसऱ्यावेळी जागे होणे सामान्य असते; मात्र सतत जागे होणे आरोग्य समस्येचे संकेत असू शकतात.

**तणाव आणि चिंता**

सततचा मानसिक ताण शरीराला अलर्ट स्थितीत ठेवतो. अशावेळी झोपेत असूनही मेंदू शांत होत नाही. दिवसभर मनात राहिलेल्या नकारात्मक विचारांचा भार किंवा काही गोष्टी ज्या आपण दडपून ठेवतो त्या रात्री या वेळेस जागे करत असतात.


**जैविक घड्याळाचा बिघाड**

आपल्या शरीरातील नैसर्गिक घड्याळ म्हणजे , हे आपल्याला झोपायला आणि जागे व्हायला मदत करते; पण जर आपली झोपेची वेळ, वेळेवर जेवण नसेल, तर हे घड्याळ बिघडू शकते. त्यामुळे पहाटे लवकर जाग येणे ही त्याचीच एक प्रतिक्रिया असते.

**हार्मोन्स आणि शरीरातील घडामोडी**

रात्री तीन नंतर शरीरात 'कॉर्टिसॉल' नावाचे स्ट्रेस हार्मोन नैसर्गिकरीत्या वाढायला लागतं.

# लहानपणातच वाढतो लठ्ठपणाचा धोका



**आरोग्यवेध**
**डॉ. अजेय गर्जे**

मुलांमध्ये लठ्ठपणा वाढेल की नाही हे जाणून घेणे आता कठीण राहिलेले नाही. अलिकडच्या एका अभ्यासातून असे दिसून आले आहे, की सहा वर्षांच्या वयात आता संबंधित मुलांत लठ्ठपणा वाढेल, की नाही हे शोधता येते.

डच शास्त्रज्ञांच्या मते, पहिली पाच वर्षे मुलाच्या निरोगी आयुष्यासाठी सर्वात महत्त्वाची असतात. ३,५०० हून अधिक मुलांच्या नोंदी तपासल्यानंतर असे आढळून आले, की जर ६ वर्षांच्या वयात बॉडी मास इंडेक्स एका युनिटने वाढला तर १८ वर्षांच्या वयापर्यंत लठ्ठपणा किंवा जास्त वजनाचा धोका दुप्पट होतो.

**लठ्ठपणा किती धोकादायक आहे?**

लठ्ठपणा हा एक मूक हत्यारा आहे. तो रक्तदाब आणि कर्करोगासारख्या अनेक गंभीर आजारांना जन्म देतो. अनेक अभ्यासातून असे आढळून आले आहे, की मुलांमध्ये लठ्ठपणा वेगाने वाढत आहे. सुमारे अर्धी मुले वेळेपूर्वीच जास्त वजनाची बळी ठरतात. 'युरोपीयन काँग्रेस ऑन ओबेसिटी'मध्ये सादर केलेल्या एका वेगळ्या संशोधनातून असे दिसून आले आहे, की गेल्या १५ वर्षांत किशोरवयीन मुलांमध्ये लठ्ठपणाचे प्रमाण ५० टक्क्यांनी वाढले आहे. 'अल्ट्रा-प्रोसेस्ड' अन्न आणि खराब जीवनशैली हे मुलांमध्ये लठ्ठपणासाठी सर्वात मोठे जबाबदार घटक आहेत. अशा परिस्थितीत, बालपणातच हे जाणून घेणे महत्वाचे आहे की लठ्ठपणा तरुणपणात होईल की नाही.

**बालपणात लठ्ठपणाचा अंदाज लावण्याचे तंत्र**

अलीकडेच शास्त्रज्ञांनी एक अनुवांशिक चाचणी (पॉलिजेनिक रिस्क स्कोअर) विकसित केली आहे, जी पाच-सहा वर्षांच्या वयापर्यंत सांगू शकते, की प्रौढत्वात मुलाला लठ्ठ होण्याचा किती धोका आहे. ही चाचणी डीएनएमधून मिळवलेल्या अनुवांशिक डेटाचे विश्लेषण करते आणि लठ्ठपणाचा धोका वाढवणारे हजारो अनुवांशिक प्रकार ओळखते. जर पालक लठ्ठ असतील, तर मुलांमध्ये लठ्ठपणाचा धोका जास्त असतो. नवीन अनुवांशिक चाचण्या ही अनुवांशिक प्रवृत्ती समजून घेण्यास मदत करतात.

✲ **बॉडी मास इंडेक्स**: मुलांमध्ये 'बीएमआय' त्यांच्या वय आणि लिंगानुसार मोजला जातो. दोन वर्षे किंवा त्याहून अधिक वयाच्या मुलांमध्ये, ९५ व्या पर्सेंटाइलपेक्षा जास्त 'बीएमआय' लठ्ठपणाचे लक्षण मानले जाते. तथापि, 'बीएमआय' केवळ सध्याच्या लठ्ठपणाचे संकेत देते. भविष्यातील लठ्ठपणाचे नाही.

✲ **मशीन लर्निंग**: एआय आणि मशीन लर्निंग मॉडेल्स बालपणातील लठ्ठपणाचा अंदाज लावण्यात अचूकता वाढवतात. हे मॉडेल्स जन्माच्या वेळी मुलाचा 'बीएमआय', गर्भावस्थेतील वय आणि विविध क्लिनिकल भेटींमधून मिळालेला 'बीएमआय' यासारख्या मूलभूत डेटाचा वापर करून पाच वर्षांच्या वयापर्यंत मुलाच्या लठ्ठपणाच्या श्रेणीचा अंदाज लावू शकतात.

# प्रभावी मध आणि दालचिनी



**आयुर्वेद आणि विकार**

मध आणि दालचिनी हे घटक जवळपास प्रत्येक घरात आढळतात. या दोहोंमध्ये औषधी गुणधर्म आहेत. आयुर्वेदानुसार या दोन्ही घटकांच्या एकत्रिकरणाने अधिक परिणाम साधला जातो. अनेक समस्यांवर हा रामबाण उपाय ठरू शकतो.

✲ मध आणि दालचिनीच्या सेवनामुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढून विविध विकारांना आळा बसू शकतो. या दोन्ही घटकांमध्ये भरपूर अँटीऑक्सिडंट्स आणि बॅक्टेरियाविरोधी गुणधर्म असतात. पचनशक्ती सुधारण्यासाठीही या मिश्रणाचा वापर करता येईल. यामुळे पोटाशी संबंधित समस्या दूर होऊ शकतील. पोटदुखीपासून रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यापर्यंत अनेक विकारांवर, व्याधींवर प्रभावी औषध म्हणून दालचिनी आणि मधाच्या मिश्रणाचा वापर करता येईल.

✲ मुरुमांची समस्या दूर करण्यासाठी मध आणि दालचिनीचा लेप तयार करून चेहऱ्याला लावता येईल. तीन चमचे मधात एक चमचा दालचिनीची पूड घालून हा लेप तयार करता येईल. हा लेप रात्री झोपण्याआधी मुरुमांवर लावा. सकाळी धुवून टाका. त्वचेशी संबंधित

✲ आर्थ्रायटिसच्या वेदनांवर मात करण्यासाठी दालचिनी आणि मधाचं एकत्रित सेवन करता येईल. कोमट पाण्यात मध आणि दालचिनीची पूड घालून लेप तयार करा. हा लेप प्रभावित भागावर लावा. आराम मिळेल.

# प्रसूतीनंतरचं आहारतंत्र



**काय खावं?**

गर्भधारणेनंतर तसंच प्रसूतीनंतर महिलांना बऱ्याच शारीरिक आणि मानसिक बदलांना सामोरं जावं लागतं. या काळात शरीराची बरीच झीजही होते. त्यातही नोकरी-व्यवसाय करणाऱ्या महिलांना ही दुहेरी जबाबदारी सांभाळताना बरीच कसरत करावी लागते. म्हणूनच महिलांनी प्रसूतीनंतर पोषक आहार घ्यायला हवा. प्रसूतीनंतरच्या आहारतंत्राविषयी...

✲ आहारात ताजी फळं आणि भाज्यांचा समावेश असावा. तुमच्या जेवणाचं अर्धं ताट ताजी फळं आणि भाज्यांनी भरलेलं हवं. त्यातही हिरव्या पालेभाज्यांचा अधिक समावेश करायला हवा तर उर्वरित अर्ध्या भागात ओट्स, हातसडीच्या तांदळाचा भात, गव्हाचा ब्रेड, पोळ्या अशा पूर्ण धान्याचा समावेश असावा.

✲ शरीराची कॅल्शियमची गरज भागवण्यासाठी आहारात दूध आणि दुग्धजन्य पदार्थांचा समावेश करा. दूध, दही, पनीर असे पदार्थ खा.


✲ या काळात जंक फूड, प्रक्रिया केलेले, खारवलेले, तळलेले पदार्थ खाऊ नका. मधल्या वेळची भूक भागवण्यासाठी एखादं फळ, सुका मेवा, चणे, शेंगदाणे अशा आरोग्यदायी पदार्थांची निवड करा.

✲ प्रसूतीनंतर शरीराला लोह आणि फॉलिक ॲसिडची गरज असते. टोमॅटो, आवळा, मोड आलेली कडधान्यं, सुका मेवा, अंजीर, मनुका, गूळ, बीट ,भेंडी, पालक, गाजर, चिकन अशा पदार्थांमधून या पोषक घटकांची गरज भागू शकते.

✲ कॉफी, कार्बनयुक्त पेयांचं प्रमाण कमी करा. मद्यपानही टाळा.

✲ गरोदरपणात वाढलेलं वजन कमी करण्यासाठी लगेच डाएट करू नका. या काळात झालेली झीज भरून काढण्यासाठी शरीराला पुरेसा वेळ द्या. शास्त्रीय पद्धतीने आणि डॉक्टरांच्या सल्ल्याने वजन कमी करा.

# जेवल्यानंतर कोणत्या गोष्टी टाळाव्यात...



**कुठे चुकतो आपण?**

आपल्या शरीरावर आहाराचा परिणाम होत असतो. जेवल्यानंतर तीव्र स्वरुपाचा व्यायाम करू नये, रात्री हलका आहार घ्यावा हे आपण जाणतो. पण जेवणानंतर केलेल्या चुका आपल्याला महागात पडू शकतात. पुरेशा माहितीअभावी या चुका घडू शकतात. जेवल्यानंतर कोणत्या गोष्टी टाळाव्यात याविषयी...

✲ फळांमधून बरेच पोषक घटक मिळतात. पण जेवणानंतर फळं खाऊ नयेत. पोषक घटकांचा लाभ मिळवण्यासाठी फळं रिकाम्या पोटी किंवा जेवणानंतर दोन ते तीन तासांनी खायला हवीत. जेवणानंतर लगेच फळं खाल्ल्यामुळे अन्नपचनावर परिणाम होऊ शकतो.

✲ जेवल्यानंतर लगेच झोपू नये. रात्रीच्या जेवणानंतर साधारण दोन तासांनी झोपणं गरजेचं आहे. जेवणानंतर शरीर अन्न पचनाची क्रिया सुरू करतं. मात्र झोपल्यामुळे या क्रियेत अडथळे येतात. अन्नपचन झालं नाही तर गॅस, ॲसिडिटी, पोट बिघडणं अशा समस्या निर्माण होऊ शकतात.

✲ धूम्रपान आणि तंबाखूचं सेवन शरीरासाठी किती हानिकारक आहे हे आपण जाणतो. अनेकजण जेवल्यानंतर धूम्रपान करतात. मात्र यामुळे पोटाच्या समस्या निर्माण होऊ शकतात.

✲ जेवल्यानंतर लगेच पाणी पिऊ नये. पाण्यामुळे ॲसिडिटीची समस्या निर्माण होऊ शकते. त्यामुळे जेवणानंतर साधारण अर्ध्या तासाने पाणी प्यायला हवं.

**नवसंशोधन**

## शाकाहार ठरतो लाभदायी

शाकाहारामुळे मूत्रमार्गाच्या जंतूसंसर्गाचा धोका कमी होत असल्याची बाब एका संशोधनातून समोर आली आहे.



ई कोलाय सारख्या बॅक्टेरियामुळे मूत्रमार्गाचा जंतूसंसर्ग उद्भवतो. हा बॅक्टेरिया मूत्रमार्गात प्रवेश करून मूत्रपिंड तसंच ग्रंथींचं नुकसान करतो. तैवानमधल्या एका संस्थेत याबाबतचं संशोधन करण्यात आलं आहे. 'सायंटिफिक रिपोर्टस' या जर्नलमध्ये हे संशोधन प्रसिद्ध झालं आहे.

**दंतारोग्य**

## दातांमध्ये फटी असतील तर...



तुमच्या दोन दातांच्या मध्ये मोठ्या फटी असतील तर अधिक काळजी घ्यायला हवी. या फटींमध्ये अडकलेले अन्नकण कुजून तोंडाला दुर्गंधी येऊ शकते. दात घासणं तसंच फ्लॉसिंग म्हणजे दातांमध्ये अडकलेले अन्नकण काढण्यासोबतच इतरही उपायोजना करायला हव्यात. दातांच्या फटींमध्ये जाऊन अन्नकण स्वच्छ करणारी काही उपकरणं उपलब्ध आहेत. या उपकरणांचा वापर करून प्लाकच्या निर्मितीला आळा घालता येतो.

**जपणूक त्वचेची**

## टाळा त्वचेचं नुकसान



व्यायाम केल्यानंतर अनेकांच्या चेहऱ्यावर मुरुमं, पुटकुळ्या येतात. घाम, धूळ, घाणीमुळे असं होऊ शकतं. जीममध्ये व्यायाम करत असाल तर उपकरणं वापरण्याआधी ती नीट पुसून घ्या. व्यायाम करताना केस नीट बांधून घ्या. घामाचे हात वारंवार चेहऱ्याला लावू नका. व्यायामानंतर आंघोळ करा. घामेजलेले कपडे बदला. घामाच्या कपड्यांमध्ये फार काळ राहू नका. व्यायामाला जाताना ढगळ कपडे घाला. व्यायामादरम्यान चेहऱ्यावर कोणताही मेक अप नसावा.

**आजीबाईचा बटवा**

## केसांचं गळणं थांबवण्यासाठी...

केस गळण्याची समस्या खूपच त्रासदायक ठरू शकते. केस गळण्यावर वेळेत उपाय केले नाहीत तर टक्कलही पडू शकतं.




काही घरगुती उपायांनी केस गळण्यावर नियंत्रण मिळवता येतं. कांद्याचा रस लावल्यामुळे केस गळणं थांबू शकतं. कांदा किसून त्याचा रस काढा. हा रस टाळूला लावा. दोन तासांनी केस धुवून टाका. हा उपाय आठवड्यातून दोन ते तीन वेळा करा. यामुळे बराच लाभ होईल. ग्रीन टीमुळेही केस गळणं थांबू शकतं. थोडा ग्रीन टी पाण्यात उकळून घ्या. हे पाणी टाळूवर लावा. तासाभराने केस धुवून घ्या.

## चिंचभुवन गावठाणातील तयार नागरी सुविधा
# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते मनपाला हस्तांतरीत

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २० : चिंचभुवन येथील पर्यायी गावठाणातील सेक्टर क्रमांक ३४, ३५ व ३६ मध्ये तयार करण्यात आलेल्या नागरी सुविधा आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नागपूर महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्यात आल्या. तसेच मिहान इंडिया लिमीटेडकडून मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी ५० लाखांचा धनादेश सुपूर्द करण्यात आला.

रामगिरी शासकीय निवासस्थानी एका छोटेखानी कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागरी सुविधांचे हस्तांतरण तसेच मिहान इंडिया लिमीटेडकडून मुख्यमंत्र्यांच्या हस्ते धनादेश सुपूर्द करण्यात आले. मनपा आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, मनपाच्या अतिरीक्त आयुक्त वसुमना पंत, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय तथा रूग्णालय नागपूरचे अधिष्ठाता डॉ. राज गजभिये, इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय तथा रूग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. रवि चव्हाण, मिहान इंडिया लिमीटेडचे वरिष्ठ विमानतळ संचालक एम. ए. आबीद रूही आदी यावेळी उपस्थित होते.



जिल्हाधिकारी डॉ. इटनकर यांनी चिंचभुवन येथील पर्यायी गावठाणातील नागरी सुविधा मनपाला हंस्तातरण करण्याबाबत संक्षिप्त माहिती दिली. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मनपा आयुक्तांना हस्तांतरण प्रमाणपत्र सुपूर्द करण्यात आले. मिहान इंडिया लिमीटेडकडून मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी 50 लाख रूपयांचा धनादेश यावेळी मुख्यमंत्र्यांनी स्वीकारला. मिहान इंडिया लिमीटेडच्या सामाजिक उत्तरदायीत्व निधी (सीएसआर) अंतर्गत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय तथा रूग्णालयला ४५ लाख ४३९३६ रूपयांचा धनादेश, इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय तथा रूग्णालयाला ३० लाखांचा, महानगरपालिकेला २५ लाखांचा तर वुमेन एज्युकेशन सोसायटीला (एलएडी महाविद्यालय) २४ लाख ९३ हजारांचा धनादेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आला.

मौजा-जयताळा, भामटी, चिंचभुवन व शिवणगांव या शहरी भागातील प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ च्या पूर्वेस चिंचभुवन येथे ५८.२१ हेक्टर क्षेत्रात अभिन्यास तयार करुन सुमारे १५०६ भुखंडाची आखणी करण्यात आली आहे. शिवणगांव येथील एकूण ११६१ प्रकल्पग्रस्तांना भूखंड आवंटीत करण्यात आले असून यापैकी १०७५ प्रकल्पग्रस्तांना भूखंडाचा ताबा देण्यात आला आहे. यापैकी सुमारे ४०० ते ४१५ प्रकल्पग्रस्त नवीन पर्यायी गावठाणात राहावयास गेलेली आहेत. तसेच सुमारे ६०० घरांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.

## नाला ओलांडताना मुख्याध्यापकाचा दुर्दैवी मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, गडचिरोली, दि. २० : गडचिरोली जिल्ह्यात दोन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे अनेक भागांत पूरपरिस्थिती निर्माण झाली असून नदी-नाले तुडुंब भरून वाहत आहेत. अशाच परिस्थितीत नाला ओलांडण्याच्या प्रयत्नात एका जिल्हा परिषद मुख्याध्यापकाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना समोर आली आहे.

वसंत सोमा तलांडी (४४), रा. जोनावाही, ता. भामरागड असे मृत मुख्याध्यापकाचे नाव असून ते पेरमिली जवळील पल्ले येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत कार्यरत होते. १८ ऑगस्ट रोजी शाळा सुटल्यानंतर ते आपल्या मूळ गावी जोनावाहीकडे सिपनपल्ली मार्गे परतत असताना सायंकाळच्या सुमारास सिपनपल्ली नाला ओलांडताना वाहून गेले.

या घटनेनंतर शोधमोहीम राबविण्यात आली. अखेर १९ ऑगस्ट रोजी सायंकाळच्या सुमारास सिपनपल्ली नाल्यात अज्ञात व्यक्तीचा मृतदेह आढळून आला. घटनेची माहिती मिळताच महसूल विभागाने संबंधित शिक्षकाच्या नातेवाइकांना बोलावून ओळख पटवली असता मृतदेह वसंत सोमा तलांडी यांचा असल्याचे स्पष्ट झाले.

या दुर्घटनेमुळे मंडळातील ग्रामस्थांमध्ये हळहळ व्यक्त केली जात आहे. विशेष म्हणजे, ही भामरागड तालुक्यातील दुसरी अशी घटना असून याच दिवशी कोडपे येथील १९ वर्षीय तरुण लालचंद कपिलसाय लकडा खंडी नाला ओलांडताना वाहून गेला होता. शिक्षक वसंत तलांडी यांच्या मागे पत्नी, दोन मुली आणि एक मुलगा असा परिवार आहे. त्यांच्या निधनामुळे पल्ले शाळेसह संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे.

## गोपीचंद पडळकरांपासून भाजपचा वैताग?

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २० : भाजपमधील सर्वात चर्चित आणि वादग्रस्त आमदार कोण? उत्तर एकच गोपीचंद पडळकर. सतत आक्रमक भूमिका, हिंदुत्ववादी विधाने, इतर धर्मांवर आरोप आणि वारंवार वाद निर्माण करणाऱ्या कृतींमुळे पडळकर कायम चर्चेत राहतात. मात्र या वादग्रस्त प्रतिमेचा फटका आता थेट भाजपच्या गळ्यात पडताना दिसतो आहे.



पावसाळी अधिवेशनात विधानभवनातील गोंधळ, मारहाण प्रकरण, नंतर सभागृहासमोर केलेली माफी झ या सगळ्यामुळे पडळकरांची केवळ राज्यातच नव्हे तर भाजपमध्येही नाचक्की झाली. फडणवीसांनीदेखील ह्लआमदार माजलेतह्व असे विधान करून अप्रत्यक्षपणे पडळकरांवरच बोट ठेवले होते. याशिवाय त्यांचे मोर्चे अनेकदा दंगलीस कारणीभूत ठरल्याचा आरोप आहे.

मात्र पडळकरांचा धनगर समाजावरचा प्रभाव, शरद पवार, अजित पवारांवरचे हल्ले आणि आक्रमक विरोधकाची भूमिका यामुळे भाजपला पर्याय नव्हता. पण आता फडणवीसांनी सांगलीतूनच नवा सुसंस्कृत धनगर चेहरा शोधला आहे. तो म्हणजे अॅड. चिमणराव डांगे.

डांगे घराणं भाजपसाठी नवीन नाही. ज्येष्ठ नेते अण्णासाहेब डांगे यांनी नुकताच मुलांसह पक्षप्रवेश केला. स्वतः फडणवीस त्यांच्या प्रवेशासाठी हजर राहिले. यामागे धनगर समाजाला पडळकरांच्या पलीकडे एक सक्षम पर्याय देणे हा डाव असल्याचे बोलले जात आहे.

डांगे यांच्या मागे शैक्षणिक संस्था, सूतगिरणी, स्थानिक जनाधार आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे धनगर मतपेढी, हे सर्व आधारस्तंभ आहेत. राष्ट्रवादीत असतानाही जयंत पाटलांनी डांगे यांना संधी दिली होती. आता भाजपमध्ये ते प्रवेशल्याने धनगर समाजाचा कल भाजपकडेच मजबूत होणार हे स्पष्ट झाले आहे. पडळकरांच्या वादग्रस्त प्रतिमेमुळे पक्षाची अडचण वाढतेय आणि त्याच वेळी डांगे यांच्यासारखा सुसंस्कृत धनगर चेहराह्व उभा करून भाजप नव्या समीकरणांची जुळवाजुळव करत आहे. आता खरी उत्कंठा अशी की, पडळकरांना झुकतं माप देणारा भाजप खरोखरच त्यांच्यापासून वैतागला आहे का? याचे उत्तर लवकरच वाढणार आहे.

## साबांविसह विविध विभागांकडे ८९ हजार कोटींची देणी प्रलंबित

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २० : सार्वजनिक बांधकाम विभाग, ग्रामविकास विभाग, जलजीवन मिशन अंतर्गत जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभागाकडे केलेल्या कामांसह इतर अनेक विभागांकडील ८९ हजार कोटींची देयके थकल्याने शासकीय कंत्राटदारांनी आंदोलनाचं हत्यार उपसले.

महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघाने ठरवल्या प्रमाणे नागपूर कॉन्ट्रॅक्टर्स असोशिएशनने जिल्हाधिकारी कार्यालयांसमोर धरणे आंदोलन करण्यात करीत निवेदन देण्यात आले.



गेल्या १० महिन्यांपासून सरकारकडून केवळ आश्वासनांपलिकडे काहीही मिळत नसल्याने १९ ऑगस्टला राज्यव्यापी आंदोलन करण्याचा निर्णय महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ, राज्य अभियंता संघटना आणि महाराष्ट्र राज्य पाणीपुरवठा कंत्राटदार संघटनेने घेतला होता.

मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना या विषयावर संघटनेच्या शिष्टमंडळासोबत बैठक घ्यावी, असं विनंती पत्र तीन ते चारवेळा दिलं. पण, याबाबत फक्त संबंधितांचे सचिव किंवा इतर मंत्र्यांकडून फक्त बैठकीचं आश्वासन दिलं जातं. त्यापुढे हा विषय जातच नाही, ही राज्यासाठी अत्यंत खेदजनक बाब असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे.

शासनाच्या या निष्क्रिय धोरणांमुळं अनेक कंत्राटदार, अभियंते आर्थिक आणि मानसिक तणावाखाली आहेत. काही कंत्राटदारांनी या निराशेपोटी आपलं जीवन संपवलं. यामुळे राज्यातील कंत्राटदार समुदायाला मोठा धक्का बसला आहे.

याच निराशेतून काही कंत्राटदारांनी १५ ऑगस्ट २०२५ रोजी स्वातंत्र्यदिनी आपलं जीवन संपवण्याची घोषणा केली होती. परंतु, संघटनांनी स्वातंत्र्यदिनाच्या पावित्र्याची जाणीव करून देऊन आणि या शुभदिनी असे कृत्य टाळण्याचे आवाहन करून त्यांचं मनपरिवर्तन केलं. यामुळे मोठा अनर्थ टळला. सार्वजनिक बांधकाम विभागाकडे ४० हजार कोटी, जलजीवन मिशन अंतर्गत १२ हजार कोटी, ग्राम विकास विभाग ६ हजार कोटी, जलसंधारण व जलसंपदा विभाग १३ हजार कोटी आणि नगर विकास अंतर्गत ४२१७ कोटी, डीपीसी अंतर्गत २५१५ आणि ग्रामीण सुधारणा विभागाकडे १८ हजार कोटींची देयके प्रलंबित असल्याची माहिती नागपूर कॉन्ट्रॅक्टर्स असोसिएशनचे अध्यक्ष सुबोध सरोदे व सचिव रूपेश रणदिवे यांनी दिली आहे. थकबाकी न मिळाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा संघटनेने दिला आहे.

## प्लास्टिकमुक्त पर्यावरणासाठी अर्थ ५ कटीबद्ध

लोकजागर

भारतातील पर्यावरणीय संघटना, अर्थ ५आर, प्लास्टिक प्रदूषणाचा सामना करण्याची निकड ओळखते. अर्थ ५आरच्या उपक्रमांचा उद्देश प्लास्टिक कचरा व्यवस्थापनाबद्दल जागरूकता निर्माण करणे आणि समुदायांमध्ये शाश्वत पद्धतींना प्रोत्साहन देणे आहे. एकट्या मुंबईत दररोज सुमारे १०,००० मेट्रिक टन कचरा निर्माण होतो, परंतु केवळ ३,५०० मेट्रिक टन कचरा गोळा करून त्यावर प्रक्रिया केली जाते.



धारावीत, हजारो लोक प्लास्टिक कचऱ्याचे पुनर्वापर करण्याचे काम करतात. भारतात फक्त ६०% प्लास्टिक कचऱ्याचा पुनर्वापर केला जातो आणि त्यातील बराचसा भाग अनौपचारिक पद्धतीने केला जातो जो कार्यक्षम किंवा पर्यावरणपूरक नसू शकतो. भारतात दररोज सुमारे २६,००० टन प्लास्टिक कचरा निर्माण होतो आणि एकेरी वापराच्या प्लास्टिकमधून येतो.

अर्थ ५आर प्लास्टिक कचरा व्यवस्थापनासाठी बहुआयामी दृष्टिकोन वापरते, ज्यामध्ये कार्यक्रम नियोजन, प्रत्यक्ष अंमलबजावणी आणि फील्डवर्क तज्ञ आणि स्वयंसेवकांसह सहकार्य यांचा समावेश आहे. प्लास्टिक संकलन मोहीम आणि जागरूकता मोहिमा यासारख्या उपक्रमांद्वारे, अर्थ ५आर प्लास्टिकचा वापर कमी करण्यासाठी आणि पुनर्वापराला प्रोत्साहन देण्यासाठी प्रयत्नशील आहे.

स्थानिक समुदायांमध्ये विविध प्रकारच्या कचऱ्यासाठी स्वतंत्र डब्यांसह सुधारित कचरा संकलन आणि पृथक्करण प्रणाली देखील स्थापित करणे. वर्तुळाकार अर्थव्यवस्थेत, संसाधनांचा कार्यक्षमतेने वापर केला जातो आणि उत्पादने आणि साहित्य शक्य तितक्या काळ वापरात ठेवून कचरा कमी केला जातो.

प्लास्टिक क्रेडिट्सवर खर्च केलेला पैसा नंतर पर्यावरणीय प्रकल्पांसाठी वापरला जाईल ज्यामुळे तुम्ही जितके प्लास्टिक कचरा निर्माण करता तितकेच प्लास्टिक कचरा नष्ट होईल. जर एखादी कंपनी त्यांच्या उत्पादनाच्या प्रमाणात प्लास्टिक क्रेडिट्स खरेदी करते, तर ते प्लास्टिक तटस्थ मानले जातात. सोप्या भाषेत सांगायचे तर, प्लास्टिक तटस्थता तुम्हाला तुमचा प्लास्टिक वापर संतुलित करण्यास सक्षम करते. पुनर्वापर कार्यक्रमांमध्ये कचरा कमी करण्यासाठी आणि साहित्याचा पुनर्वापर जास्तीत जास्त करण्यासाठी विविध पद्धतींचा समावेश आहे.

पारंपारिक पुनर्वापरात कागद आणि प्लास्टिकसारख्या साहित्यावर प्रक्रिया करून नवीन उत्पादने तयार केली जातात. अपसायकलिंगमुळे टाकून दिलेल्या वस्तूंचे उच्च-मूल्य असलेल्या उत्पादनांमध्ये पुनर्वापर केले जाते. अर्थ ५आरच्या व्हॉलंटियरइन मॉडेलमध्ये, सहभागी कचरा स्वच्छता सर्वेक्षण आणि विश्लेषणात सहभागी होतात, जिथे ते अर्थ ५आर ॲपमध्ये आढळणाऱ्या वस्तूंच्या प्रकार आणि प्रमाणांचा डेटा इनपुट करताना कचरा गोळा करतात आणि वेगळे करतात.

या डेटामध्ये टेट्रापॅक, सिंथेटिक फायबर, प्लास्टिक, काच, धातू, ई-कचरा, वैद्यकीय कचरा, सेंद्रिय आणि बरेच काही यासारख्या श्रेणींचा समावेश आहे. प्लास्टिक कचरा व्यवस्थापनासाठी अर्थ५आरचा समग्र दृष्टिकोन, नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानासह आणि प्लास्टिक कचरा व्यवस्थापन आणि सामुदायिक सहभागासाठी अर्थ ५आरचे प्रयत्न, प्लास्टिकमुक्त भविष्य निर्माण करण्याच्या त्याच्या वचनबद्धतेचे उदाहरण देतात.

■ ■ ■

## निर्मिती पाईप्सची यशोगाथा पार्वतीबाईची

महिलांना सक्षम करणाऱ्या, बेरोजगारांना रोजगार देणाऱ्या अवघं नववी पर्यंत शिक्षण असताना यशस्वी उद्योजक होऊन मनाशी ठरवलं तर महिला काहीही करू शकतात हे सिद्ध करणाऱ्या छत्रपती संभाजीनगरच्या पार्वतीबाई महादेव फुंदे यांची संघर्षकथा महिलांसाठी प्रेरणादायी आहे.




कारखान्यात काम करणाऱ्या कामगाराच्या पत्नीने स्वतःच्या जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर शून्यातून विश्व निर्माण केलं. अवघं नववी पर्यंत शिक्षण आणि त्यात आर्थिक परिस्थिती जेमतेम असताना परिस्थितीशी दोन हात करत अशक्य वाटणार उद्योजक होण्याचं स्वप्न पार्वतीबाई फुंदे यांनी पूर्ण केलं आहे. स्वप्न पूर्ण केलंच नाही तर देशभरात मोजक्याच असलेल्या (फाइव्ह स्टार एम.आय.डी.सी) पंचतारांकित औद्योगिकनगरीत पी.यू.सी. पाईप निर्मितीची कंपनी उघडली आहे.

पार्वतीबाईंच्या कंपनीचा वर्षाकाठीचा टर्न ओव्हर कोट्यवधी रुपयांचा आहे. याहून पुढे जात आता त्यांचं ११ वर्षाच्या संघर्षाचा विजय असून त्यांनी महिलासाठी उघडलेल्या औद्योगिक संस्थेला पाच एकर जमीन मंजूर झाली असून या जमिनीवर येत्या वर्षभरात विविध ५१ प्रकाराचे उद्योग सुरु करणार आहेत. यातून सुमारे ७०० ते ८०० बेरोजगारांना रोजगार मिळणार आहे.

### पार्वतीबाई फुंदे यांची प्रेरणादायी गोष्ट

पार्वतीबाई यांचा जन्म बीड जिल्ह्यातील एका शेतकरी कुटुंबात झाला. लहानपणीच त्यांचं लग्न महादेव फुंदे यांच्यासोबत झाले. महादेव हे छत्रपती संभाजीनगर येथील एका खासगी कंपनीत कामगार म्हणून काम करत होते.यावरच त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह व्हायचा. पार्वती बाई यांचे स्वप्न काही औरच होते. त्यांना लहानपणापासून उद्योजक व्हायचे होते. मात्र, त्यांचं फक्त ९ वी पर्यंत शिक्षण असल्याने त्यांना अनेक अडचणी आल्या. मात्र त्यांनी हार न मानता त्यांचे प्रयत्न सुरु ठेवले आणि अखेर त्याला यश आलं.

सरकार आणि एमआयडीसीकडे वारंवार पाठपुरावा केला. अनेक बँकांचे उंबरठे झिजवले आणि पार्वतीबाई यांच्या प्रयत्नांना अखेर सन २००५ यश आले. भारतातील मोजक्या असलेल्या फाइव्ह स्टार एमआयडीसीतील एक असलेल्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील शेंद्रा पंचतारांकित औद्योगिक नगरीतील 'डी' सेक्टरमध्ये ९५ क्रमांकाचा फ्लॉट मंजूर झाला. बँकेकडून कर्ज घेऊन या ठिकाणी त्यांनी पी.व्ही.सी पाईप बनविण्याची कंपनी टाकली. पाईपची निर्मिती सुरु केली, कंपनी सुरु होऊन अनेक महिने उलटले मात्र उत्पादन केलेले पाईप विकलेच नाही.

त्यांनी प्रशिक्षण घेण्याचं ठरवलं. प्रशिक्षण घेऊन त्यांनी मराठवाड्यात फिरुन शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाईपची मार्केटिंग केली. शेतकऱ्यांना इतर कंपन्यापासून कमी दरात पाईप विकले. वेळ प्रसंगी त्यांनी उधारीवर शेतकऱ्यांना पाईपची विक्री केली. अनेक महिने एकही पाईप न विकलेल्या पार्वती बाई यांच्या कंपनीत आता त्यांच्या किसान पाईप साठी अनेक महिने ग्राहकांना वेटिंगवर राहावे लागत असून कर्ज घेऊन सुरु केलेल्या कंपनीची वर्षाला दीड कोटी रुपयांपर्यंत उलाढाल होत आहे.

एकूणच पार्वतीबाई सारख्या प्रचंड आत्माविशाव्साच्या बळावर पाईप निर्मिती व्यवसायात स्वताची वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या एका धडाडीच्या उद्योजक महिलेचा हा आदर्श प्रत्येक महिलेने डोळ्यासमोर ठेऊन जर कोणत्याही व्यवसायात उतरण्याचा प्रयत्न केला तर यश नक्की मिळणारच. ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## ७८ हजार हेक्टरवरील पिकांना तडाखा

■ महासागर प्रतिनिधी
बुलढाणा, दि. २० :

जिल्ह्यातील चार तालुक्यात सोमवारी झालेल्या अतिवृष्टीचा तब्बल ३३९ गावांतील ७८,५७४ हेक्टरवरील खरीप पिकांना जबर तडाखा बसला. एक लाखावर शेतकऱ्यांना याचा फटका बसला असून शेतकरी कोलमडून गेले आहे.

सर्वाधिक नुकसान चिखली तालुक्यात झाले. मेहकर तालुक्यातील १६१ गावांतील १२,८५० हेक्टरवरील पिकांची अतोनात नासाडी झाली. मोताळा तालुक्यातील चार गावातील ३८.५० हेक्टर, संग्रामपूर तालुक्यातील २४ गावातील २४७२ हे.वरील पिकांचे नुकसान झाले. या चार तालुक्यांत सोयाबीन, मका, तूर, उडीद, मूग, कपाशी या खरीप पिकांसह फळबागा, भाजीपाल्याचे नुकसान झाले.

चिखली तालुक्यात अतिवृष्टीने ६३,२१४ हे.वरील पिकांचे नुकसान झाले असून एक लाखांहून अधिक शेतकरी बाधित झाले. अतिवृष्टीमुळे शेतमालाचे मोठे नुकसान झाले असून संकट कोसळले आहे.

## चिखलातून वाट काढत कृषिमंत्री बांधावर

■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. २० :

अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांची अतोनात हानी झाली आहे. राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे नुकसानग्रस्त भागाची पाहणी करण्यासाठी बुधवारी वाशीम जिल्ह्यात पोहोचले. भर पावसात चिखलातून वाट काढत ते शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचले.



झालेल्या नुकसानीची व्यथा सांगताना बळीराजाच्या डोळ्यातील अश्रू अनावर झाले. नैसर्गिक आपत्तीने सर्वच हिरावून घेतले, आता जगावे कसे? असा प्रश्न नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी कृषिमंत्र्यांना केला. त्यावर कृषिमंत्र्यांनी शेतकऱ्यांना धीर दिला.

वाशीम जिल्ह्यात गेल्या काही दिवसांमध्ये मुसळधार पाऊस झाला. जिल्ह्यातील अनेक भागात अतिवृष्टीची नोंद झाली. या पावसामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शेतजमीन खरडून गेली आहे. घरांची देखील मोठ्या प्रमाणात पडझड झाली. या सर्व पार्श्वभूमीवर अतिवृष्टीने झालेल्या नुकसानाची पाहणी कृषिमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांनी बुधवारी शेतात जाऊन केली. आमदार अमित झनक, जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस, मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चव्हाण यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्र्यांनी रिसोड तालुक्यातील महागाव, बाळखेड,वाकद ,शेलूखडसे, पिंपरखेड,मसलापेन या गावांना, मालेगाव तालुक्यातील राजुरा या गावाला भेट दिली. एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहू नये. अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे तातडीने पूर्ण करावे, जिल्हा प्रशासनाने तत्काळ उपाययोजना करून पीडित शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, असे निर्देश भरणे यांनी दिले आहेत. प्रत्येक गावात झालेल्या नुकसानीचा अहवाल तातडीने शासनाकडे पोहोचवला जाईल, असेही ते म्हणाले.

## भरडाई केंद्रावर कॅमेरेच नाहीत... राईसमिलर्सवर कारवाई करा

■ महासागर प्रतिनिधी, देसाईगंज, दि. २० : शासकीय धान खरेदी केंद्रावर खरेदी करण्यात आलेला धान स्थानिक राईसमिलर्सना भरडाई करीता देण्यात येताना शासन परिपत्रकातील मुद्दा क्र. ७.७ नुसार भरडाई केंद्रावर सीसीटिव्ही कॅमेरे लावून त्याचे रेकॉर्डींग पेनड्राईव्ह मध्ये सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी राईसमिलर्सची असून दर १५ दिवसांनी सदर चित्रीकरण पेनड्राईव्ह मध्ये कॉपी करून ठेवणे आवश्यक आहे.

तसेच सदर १५ दिवसाचे चित्रीकरण जिल्हा पुरवठा अधिकारी यांना सादर करणे आवश्यक असतांना जिल्ह्यातील सिएमआर मिलींग करणाऱ्या राईसमिलर्सनी शासन परिपत्रकाला हरताळ फासला असल्याने अशा संबंधित राईसमिलर्सवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी देसाईगंज सिटीझन फोरमचे अध्यक्ष किशोर कऱ्हाडे यांनी राज्याचे अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग मंत्रालय मुंबईचे प्रधान सचिव यांचेकडे केली आहे.

गडचिरोली जिल्ह्यात शासकीय धान खरेदी केंद्रावर खरेदी करण्यात आलेला धान स्थानिक राईसमिलर्सना भरडाई करीता देतांना यात अनियमितता होऊ नये करीता राज्याच्या अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने भरडाई करिता धान देताना गिरणीधारकांची जबाबदारी निश्चित करण्यात केली आहे. मुद्दा क्रमांक ७.७ नुसार भरडाई केंद्रावर सीसीटिव्ही कॅमेरे लावून त्याचे रेकॉडींग पेनड्राईव्ह मध्ये सुरक्षित ठेवणे अत्यावश्यक करण्यात आले आहे. तसेच दर १५ दिवसांनी सदर चित्रीकरण पेनड्राईव्ह मध्ये कॉपी करून सदर १५ दिवसाचे चित्रीकरण जिल्हा पुरवठा अधिकारी यांना जतन करून ठेवण्यासाठी सादर करणे अनिवार्य आहे.

तसेच शासनाकडून सदर चित्रीकरणाची मागणी करण्यात आल्यास व तपासणीच्यावेळी सदर चित्रीकरणाचा पेनड्राईव्ह उपलब्ध करून देणे बंधनकारक असून असे चित्रीकरण न केल्यास सदर भरडाई केंद्र रद्द करण्यास पात्र राहिल, असे स्पष्ट सुचित करण्यात आले आहे.

असे असतांना जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय गडचिरोली यांचेकडे माहिती अधिकारात माहिती मागण्यात आली असता जिल्हा पुरवठा अधिकारी यांचेकडे संबंधित एकाही राईसमिलर्सने भरडाई केंद्रावर सीसीटिव्ही कॅमेरे लावून रेकॉर्डींग केली नसल्याची गंभीर बाब समोर आली आहे. जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी शासन परिपत्रकातील मुद्दा क्रमांक ७.७ नुसार एकाही राईसमिलर्सवर कारवाई केली नसल्याने जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या कार्यप्रणालीवर प्रश्न चिन्ह निर्माण होत आहे.

दरम्यान सिएमआर मिलींग करणाऱ्या राईसमिलर्सचे देसाईगंज येथील आकाश अग्रवाल गोडाऊन मधून मानवी खाण्यास अयोग्य तांदळाचा पुरवठा केल्या जात असल्याची बाब जिल्ह्यातील अहेरी, मुलचेरा व नुकतेच गडचिरोली येथील शासकीय गोदामातील गोदाम व्यवस्थापकांनी चव्हाट्यावर आणली असल्याने संबंधित राईसमिलर्स उचल केलेला धान परराज्यातील खुल्या बाजारात विक्री करून शासनाला मानवी खाण्यास अयोग्य तांदळाचा पुरवठा करीत असल्याच्या गंभीर बाबीला दुजोरा मिळु लागला आहे.

जिल्हा पुरवठा अधिकारी यांना माहिती अधिकारात माहिती मागीतली असता सदर माहिती त्यांचेकडे उपलब्ध नसल्याचे सांगीतले जात आहे.यावरून सिएमआर मिलींगमध्ये जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयाची भुमिका संशयास्पद असून जिल्ह्यातील एकाही राईसमिलर्सने भरडाई केंद्रावर सीसीटीव्ही कॅमेरे लावून रेकॉर्डींग केली नसल्याची गंभीर बाब समोर येऊ लागली आहे.

धान भरडाई करीता शासन परिपत्रकातील मुद्दा क्र. ७.७ अनुसार करारनामे करणे अनिवार्य असतांना व जे राईसमिलर्स नियमाचे पालन करीत नसतील अशा राईसमिलर्सचे करारनामे रद्द करणे अपेक्षित असतांना आजतागायत एकाही राईसमिलर्सवर कारवाई करण्यात आली नाही. त्यामुळे सिएमआर मिलींग मध्ये प्रचंड गैरव्यवहार करण्यास जिल्हा पुरवठा अधिकारी यांचीही मुक संमती असल्याची शक्यता नाकारता येत नाही.

या गंभीर तेवढ्याच धक्कादायक प्रकरणाची सखोल चौकशी करून शासन परिपत्रकाला हरताळ फासणाऱ्या सर्वांवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी कऱ्हाडे यांनी अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग मंत्रालय मुंबईचे प्रधान सचिव यांचेकडे केलेल्या तक्रारीतुन केली आहे. याबाबत काय कारवाई केली जाते, याकडे येथील नागरिकांचे लक्ष लागून आहे